रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १४५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹



(छायाचित्र : समीर मालोदे)

# शेकापचं ठरलं! इतिहास घडविणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग विधानसभा मतदार संघातून अनेक आमदार निवडून गेले. त्यांनी विधानसभेसह संपूर्ण महाराष्ट्रात अलिबागची शान कायम टिकून ठेवली. त्यांनी जनतेची मान उंचावेल, असे कार्य केले आहे. सध्याच्या आमदारांनी कधी सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले का, असा सवाल उपस्थित करीत त्या आमदाराला मतेदेखील मागण्याच अधिकार नाही, अशी टीका जयंत पाटील यांनी केली. तसेच आपली गेलेली आमदारकी या निवडणुकीत खेचून आणायची आहे. सुशिक्षीत व सर्व क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या उमेदवारांना आपण संधी दिली आहे. उद्याची निवडणूक प्रचंड मतांनी निवडून आणून १९५७ सालची पुनरावृत्ती करायची आहे, असे शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले. तसेच अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघात चित्रलेखा पाटील, पेणमध्ये अतुल म्हात्रे, पनवेलमध्ये माजी आ. बाळाराम पाटील, उरणमध्ये प्रीतम म्हात्रे, सांगोल्यात बाबासाहेब देशमुख व कंधारमध्ये श्यामसुंदर शिंदे या उमेदवारांची नावे जाहीर केली. अलिबाग विधानसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकाप नेते जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी (दि.२२) सायंकाळी भव्य सभा आयोजित करण्यात आली. यावेळी जयंत पाटील बोलत होते.




## अलिबाग झाले शेकापमय

अलिबाग विधानसभा मतदार संघातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेकापचे सरचिटणीस माजी. आ. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी सायंकाळी शेकाप भवनसमोर भव्य सभेचे आयोजन करण्यात आले. शेकापच्या अधिकृत उमेदवाराची घोषणादेखील करण्यात येणार होती. त्यामुळे अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते दुपारी तीन वाजल्यापासून शेकाप भवन समोर हळूहळू जमू लागले. बोलता बोलता चार वाजेपर्यंत संपूर्ण परिसर कार्यकर्त्यांनी फुलून गेला. काहींच्या हातात लाल बावटा, काहींनी लाल टी शर्ट, शर्ट परिधान केला. त्यामुळे संपूर्ण अलिबाग शहर शेकापमय झाल्याचे दिसून आले. सुमारे २५ हजारहून अधिक कार्यकर्ते या मेळाव्यामध्ये सहभागी झाले होते. महिला, तरुण ज्येष्ठ कार्यकर्त्यांनीदेखील स्वयंस्फुर्तीने या मेळाव्यात सहभाग घेऊन आनंदोत्सव साजरा केला.

## अलिबागमध्ये चित्रलेखा पाटील यांचे नाव जाहीर

कोरोना असो की निसर्ग, तौक्ते वादळ असो प्रत्येक संकटात जीवाची तमा न बाळगता चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी काम केले. महिला म्हणून बुरसटलेल्या विचारांमध्ये न गुरफटता एखाद्या पुरुषालाही लाजवेल असं त्यांचं काम अहोरात्र सुरु होतं. या संकटावर मात करण्यासाठी त्यांनी केलेल्या योजना आणि राजकीय वैशिष्ट्यांचे रायगडकरांसह विरोधकांनीही कौतुक केलं.

कोरोनाच्या कालावधीत नागरिकांनी आरोग्यविषयक काळजी घ्यावी, सरकारी नियमांचे पालन करावे, यासाठी त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती केली. नागरिकांना आरोग्य सुरक्षिततेसंबंधी आवाहन केले. शिवाय, ठिकठिकाणच्या गरजू लोकांना धान्य वाटप केले. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत गावात सॅनिटायझेशन केले. गरजूंसाठी कोविड सेंटर उभारले. तर, पुरासारख्या आपत्तीच्या कालावधीत अनेकांना मदतीचा हात दिला. पूरग्रस्तांना मदत केली. ग्रामीण भागातील मुलांना संगणक शिक्षण मिळावे म्हणून अनेक शाळांना कॉम्प्युटर भेट दिले. तर, तळागाळातील मुलींना शिक्षणाचे महाद्वार खुले व्हावे, याकरिता हजारो सायकलींचे वाटप केले. अशी एक ना अनेक समाजकार्य त्यांनी केली. अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघात गेल्या पाच वर्षात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत शेतकरी कामगार पक्षाने चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांचे नाव जाहीर होताच हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात विजयी घोषणाबाजी केली.

यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील म्हणाले की, विधानसभेमध्ये अलिबागच्या आमदारांची एक वेगळी प्रतिमा होती. एक वेगळा दबदबा होता. परंतु टक्केवारी घेणाऱ्या आमदारांमुळे आपल्या अलिबागचे नाव बदनाम झाले आहे. त्यामुळे आपल्याला एक वेगळा बदल घडवून आणायाचा आहे. त्यामुळे ही निवडणूक एक वेगळ्या भूमिकेची असणार आहे. चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यात महिला संवाद मेळावे घेतले. या मेळाव्यातून कार्यकर्ते, महिलांना एक वेगळी उर्जा मिळाली आहे. सर्वांची उमेद, हिंम्मत वाढविण्याचे काम मेळाव्याने केले आहे. कार्यकर्त्यांनी जोमाने काम करून चित्रलेखा पाटील यांच्या रुपाने आपला आमदार विधानसभेत पाठविण्यासाठी कामाला लागले पाहिजे. ही निवडणूक शेतकरी कामगार पक्षाच्या अस्तित्वाची आहे. या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे. या निवडणुकीत अमुलाग्र बदल करायचा आहे. सर्व शक्तीनिशी आपण उतरायचे आहे. पक्षाच्या जडणघडणीत जुन्या कार्यकर्त्यांचा वाटा मोलाचा राहिला आहे. त्यांनाही बरोबर घेऊन आपण काम करायचे आहे.

पुढे ते म्हणाले, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. विधिमंडळात प्रश्न मांडण्याची वैभवशाली आमदारकीची परंपरा ठेवली होती. पुन्हा वेगळ्या उमेदीने काम करून आपली आमदारकी खेचून आणायची आहे. त्यापध्दतीने कार्यकर्त्यांनी कामाला लागा. प्रचंड मतांनी आपले उमेदवार निवडून आले पाहिजे. या भूमिकेतून कार्यकर्त्यांनी गावागावात जाऊन आपले विचार मतदारांपर्यंत पोहचविण्याचे काम करावे. शेकापचे चिन्ह आपले उमेदवार यांची माहिती घराघरात पोहचवून या निवडणुकीत भरघोस मतांनी आपल्या उमेदवारांना निवडून देण्यासाठी कार्यत्यांनी सज्ज व्हावे. पुढील २५ वर्षे विरोधकांची आमदारकी घेण्याची हिम्मत होता कामा नये. चित्रलेखा पाटील या सुशिक्षीत असून सर्व क्षेत्रात त्यांचे काम कौतुकास्पद आहे. या निवडणुकीत वेगळी यंत्रणा उभी करून अमूलाग्र बदल करायचा आहे. ज्या पध्दतीने शेकाप गोरगरीबांसाठी लढला. त्यांना न्याय दिला. त्या पध्दतीने विचार घेत पुन्हा आपण वेगळ्या उमेदीने कामाला लागायचे आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

(सविस्तर वृत पान ३ वर)

महायुतीच्या समन्वय मेळाव्यात कडू आठवणींनाच आली उकळी

# महायुतीचे फंडे, सहकाऱ्याचे वांदे

। आविष्कार देसाई ।

। रायगड ।

राज्यातील जागा वाटपावरुन महायुतीमध्ये सातत्याने खटके उडत आहेत. नेते एकमेकांविरोधात आरोप प्रत्यारोप करत आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये याबाबत नकारात्मकता पसरत आहे. महायुतीमधील नेत्यांमध्ये समन्वय राहावा. यासाठी रायगड जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदार संघात समन्वय मेळावे घेण्यात येणार आहेत. मात्र, अलिबाग येथील हॉरीझोन सभागृहात आज पार पडलेल्या महायुतीच्या समन्वय मेळाव्यात महायुतीमधील नेत्यांनी २०१४ ते २०२४ या कालावधीत घडलेल्या कडू आठवणींनाच तापलेल्या भाषेत उकळी दिली. त्यामुळे होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणूकीत ते एक दिलाने काम करणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

समन्वय मेळावा चार वाजता सुरु होणार होता. तो अर्ध्या तासाने सुरु झाला. त्यानंतर भाजपाचे सतिश धारप, भाजपाचे समन्वयक ॲड. महेश मोहिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) माजी आमदार अनिकेत तटकरे, हर्षल पाटील हे तब्बल दीड तास उशिराने कार्यक्रमस्थळी दाखल झाले. त्याआधीच महायुतीचे उमेदवार महेंद्र दळवी आणि त्यांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सुरुवातील शिंदे गटातील नेत्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर भाजपाचे ॲड. महेश मोहिते यांनी २०१४ ते २०२४ पर्यंतचा इतिहास सर्वांपुढे वाचला. त्यामध्ये त्यांनी भाजपा आणि शिवसेना कशी विरोधात होती, एकमेकांच्या जीवावर कसे उठलो होतो. याकडे सर्व कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले. अनिकेत तटकरे यांनी देखील भाजपा आणि शिवसेनेच्या कटू आठवणी सांगितल्या.

आमदार दळवी यांच्याकडून गेल्या काही कालावधीमध्ये काही डावे-उजवे झाले असेल, ते आता विसरण्याची वेळ आली असल्याचे सतिश धारप यांनी स्पष्ट केले. सत्तेसाठी आपण पुन्हा एकत्र आलो पाहिजे. राजकारणात समज गैरसमज होतच असतात, असे सांगून त्यांनी कार्यकर्त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न केला.

### वागणुकीत सुधारणा करा

या आधी काय झाले याचा विचार करु नका, आता पुढे काय करायचे आहे, याचा विचार करा, असे अनिकेत तटकरे हे कार्यकर्त्यांच्या मनावर बिंबवत होते. महायुतीमधील कार्यकर्ते, नेत्यांनी आपापल्या वक्तव्यात आणि वागणुकीत सुधारणा करण्याचे आवाहन करत त्यांनी नेत्यांसह कार्यकर्त्यांना कानपिचक्या दिल्या. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना कसे दुर ठेवले होते. याची आठवण देखील काही कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली.

### वृंदावनमध्ये शिजतेय राजकीय डाळ

महायुतीमधील कार्यकर्त्यांना समन्वयाचे ज्ञान पाजण्यात आमदार महेंद्र दळवी मशगुल होते. तेव्हा वृदांवन येथील सतिश धारप यांच्या घरामध्ये अनिकेत तटकरे, हर्षल पाटील, ॲड. महेश मोहिते आणि स्वतः सतिश धारप हे कोणती व्यूहरचना आखण्यात दंग होते. याचा थांगपत्ता शिवसेना शिंदे गटाला लागला नाही. आमदार दळवी यांना चर्चेत स्थान न देता कोणती राजकीय डाळ शिजत होती. याची कुजबूज महायुतीमधील नेत्यांमध्ये सुरु असल्याचे कार्यक्रमस्थळी ऐकू आले. त्यामुळे समन्वय साधणाऱ्यांमध्ये कसलाच समन्वय नसल्याचे त्या निमित्ताने अधोरखित झाले.

### भाजपाला उरणच्या बंडखोरीचा विसर

अलिबाग विधानसभेमध्ये महायुतीमधील शिंदे गटाचे उमेदवार महेंद्र दळवी यांना भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांचे आव्हान राहणार आहे. भोईर हे निवडणूक लढवण्यावर ठाम असल्याने भाजपा नेत्यांची केविलवाणी स्थिती झाली आहे. बंडखोरीची विचारधारा भाजपाला मान्य नाही, असे धारप यांना येथे सांगावे लागले. परंतु, २०१९ च्या निवडणुकीत उरणमध्ये बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढवलेले महेश बालदी यांच्या पराक्रमाचा विसर धारप यांना पडल्याचे त्या निमित्ताने दिसून आले. भाजपा भोईर यांना आतून मदत करुन महेंद्र दळवी यांचा काटा तर काढणार नाही ना, अशी भीती शिवसेना शिंदे गटातील नेते आणि कार्यकर्त्यांना सतावत असावी.

## सचिन वाझे यांना जामीन मंजूर

**मुंबई :** राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि इतरांविरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गेल्या दोन वर्षांपासून तुरूंगात असलेले बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना जामीन मंजूर झाला आहे. देशमुख यांच्यासह अन्य आरोपी जामिनावर बाहेर आहेत. त्यामुळे सचिन वाझे यांनीही जामिनासाठी याचिका केली होती. सचिन वाझे हे गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात होते.

पान २ वर

# उरणमध्ये भाजपला धक्का

■ कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

। पनवेल । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेतृत्व प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वावर प्रभावित होऊन भाजप आणि इतर पक्षातील कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे प्रीतम म्हात्रे आणि पक्षातील पदाधिकाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष नारायण शेठ घरत, जितेंद्र म्हात्रे, गुरुनाथ गायकर, राम भोईर, जगदीश पवार, रामेश्वर आंग्रे, अनिल घरत यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.



शेकापचे प्रीतम जनार्दन म्हात्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेकजण

पान २ वर

## किरकोळ वादातून दोघांवर जीवघेणा हल्ला

■ जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग शहरात मंगळवारी (दि.२२) धक्कादायक घटना घडली. कामाचा मोबदला मागायला गेलेल्या दोघांवर नादब्रम्ह इडलीच्या मालकाने धारदार चाकूने हल्ला केला. ही घटना भरदुपारी मारूतीनाका येथे घडली. पोलीस स्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या कामत आळीत ही घटना घडल्यानंतर आरोपीने पलायन केले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील भाल येथील रहिवासी अक्षता दळवी (वय २२) व वायशेत येथील सायली मार्कील (वय २९) या दोघी जवळपास वर्षभरापासून नादब्रम्ह इडली दुकानाचे मालक राजेश कारिया यांच्याकडे कामाला होत्या. त्यांनी मिळून काम सोडण्याचे ठरविले होते. त्यानुसार त्यांनी कारिया यांना कळविले होते. मात्र दोन दिवसांनी सांगा असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्याप्रमाणे अक्षता, सायली मार्किल व तिचा पती रविंद्र मार्किल हे त्यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी गेले. यावेळी तरुणींनी कामाचा मोबदला मागितला.

मात्र कारिया यांनी पैसे पुढच्या वर्षी फेब्रुवारीमध्ये देण्यात येईल, असे सांगितले. यावरुन त्यांच्यात शाब्दिक मतभेद झाले. तसेच कारिया यांनी संतापाच्याभरात अक्षता व रविंद्र या दोघांवर धारदार चाकूने वार केले. यामध्ये त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात औषधोपचार सुरु आहेत.

पान २ वर

## नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के

**नांदेड :** नांदेड शहर तसेच अर्धापूर, हदगाव या तालुक्यात मंगळवारी (दि.२२) सकाळी ६.५२ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास प्राप्त झाली. या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केलवर ३.८ अशी नोंदविण्यात आली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू सावरगाव या गावात असून या या गावात असून या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

# नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र पाण्याविना

## स्वच्छतागृह, बाथरुममध्ये नाही पाण्याचा थेंब, रुग्णांसह डॉक्टरांनादेखील टंचाईचा फटका

। नेरळ । वार्ताहर ।

काही महिन्यांपूर्वी वीज नसल्याने मेणबत्तीच्या उजेडात प्रसूती करावी लागल्याची घटना नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात घडली होती. तर आता याच प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणीबाणी निर्माण झाली आहे. आरोग्य केंद्रात पाणी नसल्याने याचा फटका रुग्णांसह डॉक्टरांना देखील बसत आहे. तर पाण्याला दाब नसल्याने ते पाणी टाकीत जात नाही अखेरीस टाकीत पाण्याचा खडखडाट असल्याने शौचालय व बाथरुममध्ये पाण्याचा थेंब नसल्याची तक्रार डॉक्टर आणि रुग्णांकडून केली जात आहे.

कर्जत तालुक्यात कर्जत नंतर नेरळ हे दुसरे मोठे शहर आहे. नेरळ परिसरात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. त्यामुळे येथील लोकसंख्या वाढली. तर शहरात शासकीय आरोग्य सेवा देण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे एकमेव नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.

नेरळ शहरासह बाजूला असलेल्या कोल्हारे, ममदापूर, शेलू, माणगाव, आदी ग्रामपंचायतीमधील नागरिकांसाठी देखील हेच आरोग्य केंद्र आहे. त्यामुळे या आरोग्य केंद्रावर मोठा



भार आहे. महिन्याला सुमारे १०० गरोदर मातांची प्रसूती तर दिवसाला १५० रुग्णांची तपासणी येथे केली जाते. यासह रेल्वे स्थानकाला लागून असल्याने रेल्वे मार्गात होणारे अपघात, परिसरात होणारे अपघात त्यातील रुग्ण येथेच आणले जातात. तसेच शवविच्छेदनदेखील केले जाते. वास्तविक कर्मचारी संख्या आदींची येथे वणवा असताना देखील सध्या कार्यरत डॉक्टर आणि कर्मचारी आपले कर्तव्य चोख बजावत असल्याचे चित्र आहे.

अशात या आरोग्य केंद्रासाठी नेरळ ग्रामपंचायतीची पाईप लाईन आहे. मात्र सध्या नेरळ ग्रामपंचायत शहरात पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी अक्षम ठरत आहे. त्यामुळे शहरात नागरिकांकडून पाण्यासाठी टाहो फोडला जात आहे. तर आरोग्य केंद्रात असलेल्या जुन्या हातपंपावरून पाणी घेण्याचा प्रयत्न केला असता तोही फोल ठरला आहे. नेरळ ग्रामपंचायतीच्या पाईप लाईनवरून येणारे पाणी कमी दाबाने येत असल्याने ते आरोग्य केंद्रात उंचीवर असलेल्या टाक्यांमध्ये जात नाही. त्यामुळे आरोग्य केंद्रातील पाण्याच्या टाक्यांमध्ये खडखडाट आहे. तर येथील कर्मचारी रुग्णांना पिण्यासाठी पाणी मिळावं म्हणून खिशाला चाट पाडून विकतच पाणी आणत आहेत. तरी रोजच्या वापरासाठी पाणी मिळत नसल्याने या पाणी टंचाईचा फटका येथील निवासी डॉक्टरांसह रुग्णांना देखील बसत आहे. शनिवारी येथे आसल व जुमापट्टी येथील आदिवासी वाडीतील महिला रुग्ण दाखल झाल्या होत्या.

> पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी नेरळ कोल्हारे दोन्ही ग्रामपंचायतीला भेट देऊन तोडगा काढण्याची विनंती केली आहे. हातपंपावरून पाणी घेण्याचा प्रयत्न केला मात्र पाण्याची पातळी लवकर आटत आहे. लवकरच तोडगा काढला जाईल.
> – डॉ.नितीन गुरव

तेव्हा शौचालय व बाथरूममध्ये पाणी नसल्याची बाब आदिवासी कार्यकर्त्यांनी मांडली. मात्र आरोग्य केंद्र प्रशासन त्यापुढे हतबल झाले असल्याचे चित्र होते. तेव्हा मोठी रुग्ण संख्या असलेल्या आरोग्य केंद्रात जर वापरण्यासाठी पाणी नसेल तर रुग्णाने कुठे जावे असा प्रश्न आदिवासी संघटनेने उपस्थित करत पाण्याची सोय जिल्हा परिषदेने करावी अशी मागणी केली आहे.

# खांब येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

। खांब । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील मुठवली खु. येथे श्रेयांश याच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून एका वेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला.

महेश तुपकर हे समाजात नेहमीच वैविध्यपूर्ण उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करत आहेत. त्याच अनुषंगाने त्यांनी आपल्या मुलाच्या पहिल्या वाढदिवसापासून ते आतापर्यंत जवळपास ७ वर्षे आपल्या मुलाचा वाढदिवस



आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून व केक कापून तसेच खाऊचे वाटप करून साजरा करत आहे. यावर्षीही ता.१९ रोजी त्यांनी प्रा.शाळा सोनगाव व सोनगाव आदिवासीवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप व खाऊचे वाटप केले.

यावेळी दादा खांडेकर, मढाळी सरपंच हेमंत कडव, मारुती तुपकर, निलेश जंगम, मालसई उपसरपंच निलेश मालुसरे, सुशील खांडेकर, तुषार मालुसरे, शरद कदम, शेखर कदम, शैलेश कदम, बंटी खांडेकर आदी उपस्थित होते.

## ॲक्टीव्हा गाडी पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** ॲक्टीव्हा गाडीची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका इसमास ताब्यात घेतले आहे. फिरोज निसार अली यांची ॲक्टीव्हा गाडी राहत्या घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. अमिर हाजीत उल्ला खाान या चोरट्याची माहिती मिळाली. त्याला तेथून चोरीच्या गाडीसह ताब्यात घेण्यात आले आहे.

## ट्रॅकींगसाठी गेलेल्या इसमाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील कलावंतीण दुर्ग येथे आपल्या मित्रांसह ट्रॅकींगसाठी गेलेल्या एका इसमाच्या छातीत दुखू लागल्याने तसेच चक्कर येवून बेशुद्ध झाल्याने त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारार्थ दाखल केले असता तेथे त्याचा दुर्देवी मृत्यू झाला आहे.

आनंद शहापूरकर हा आपल्या काही सहकाऱ्यांसह पनवेल जवळील कलावंतीण दुर्ग येथे ट्रेकींग करण्याकरिता गेला असताना त्याला अचानकपणे छातीत दुखू लागल्याने तसेच चक्कर येवून बेशुद्ध झाल्याने त्याला त्याच्या सहकाऱ्याने एम जीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारार्थ दाखल केले असता तेथे त्याचा दुर्देवी मृत्यू झाला आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करा

**●वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्थेचे तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन**

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

हातातोंडाशी आलेले पीक सध्या पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे जमीनदोस्त होत चालले असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. सध्या दररोज संध्याकाळी जोराच्या वाऱ्यासह मुसळधार पडणाऱ्या पावसाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

यंदाचे नुकसान शेतकऱ्याला सहन करण्यापलीकडचे असल्याने शासनाने यांची तात्काळ दखल घेऊन ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी खालापूर तालुक्यातील वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्थेच्या वतीने तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांना लेखी निवेदन देऊन करण्यात आली



आहे.

खालापूर तालुक्यातील वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था ही शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी प्रामाणिकपणे शासन दरबारी झगडताना दिसत आहे.या संस्थेच्या वतीने अध्यक्ष सुनील रघुनाथ पाटील, मंगेश खंडू धामणसे (खानाव),खंडू शिवराम पाटील (उंबरे),हनुमंत मोरे(शिंदीवाडी परखंदे) यांनी खालापूर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्यात यावा यासाठी खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर व विमा प्रतिनिधी अरुणा रिंगे यांस निवेदन दिले आहे.

## पनवेल शहर पोलिसांचा रुट मार्च



। पनवेल । प्रतिनिधी ।

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या मार्फत एरिया डॉमिनेशन आणि रुट मार्च पनवेल शहरात तसेच करंजाडे वसाहत परिसरात सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आला.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह सीआयएसएफचे अधिकारी व कर्मचारी, जवान, आदींच्या पथकाने पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महत्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परिसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणी येथे पायी भेटी देवून तेथील परिसराची व परिस्थितीची माहिती घेण्यात आली.

त्याचप्रमाणे मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली. अशाच प्रकारे करंजाडे वसाहतीमध्ये सुद्धा पायी भेटी देवून परिसराची माहिती घेण्यात आली तसेच मतदानासाठी जनजागृती करण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसह पोलीस पाटील आदी सहभागी झाले होते.

## पनवेल तालुका पोलिसांनी केली मतदानासाठी जनजागृती

**पनवेल :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या मार्फत एरिया डॉमिनेशन आणि रुट मार्च पनवेल तालुक्यात काढण्यात आला. यावेळी मतदानासाठी जनजागृती करण्यात आली.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि.जगदीश शेलकर यांच्यासह सीआयएसएफचे अधिकारी व कर्मचारी, जवान, आदींच्या पथकाने पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महत्वाची मतदान केंद्रे, संवेदनशील परिसर, संमिश्र वस्ती तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने महत्वाची ठिकाणी येथे पायी भेटी देवून तेथील परिसराची व परिस्थितीची माहिती घेण्यात आली. त्याचप्रमाणे मतदान करण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

## मालगाडीचा धक्का लागून इसमाचा मृत्यू

**पनवेल :** रेल्वे पटरी क्रॉस करीत असताना मालगाडीचा अचानक धक्का लागल्याने दगडावर पडल्याने डोक्याला जबर जखम होवून त्यात एका इसमाचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना पोयंजे गावाच्या हद्दीत घडली आहे. सुकुराम (४५) हे रेल्वे पटरी क्रॉस करीत असताना पनवेलहून कर्जतकडे जाणाऱ्या मालगाडीचा त्यांना अचानक धक्का लागल्याने दगडावर पडल्याने डोक्याला जबर जखम होवून त्यात त्यांचा दुर्देवी मृत्यू झाला आहे.

पान १ वरून

## उरणमध्ये भाजपला धक्का

भाजप आणि इतर पक्षातून शेतकरी कामगार पक्षामध्ये जाहीर पक्ष प्रवेश करत आहेत. शेकापमध्ये पक्ष प्रवेशाचा ओघ वाढत चालला आहे. सोनारी गावातील शेकापमध्ये प्रवेश केलेल्या काही जणांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. मात्र या तरुणांनी घाबरून जाण्याचे कारण नाही, ज्यांना नोकरीवरून काढले आहे, त्यांना नोकरीला लावण्याचे काम मी करणार असल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले. घारापुरी येथील निकेतन घरत आणि रोहन पाटील या भाजपच्या कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये प्रवेश केला. प्रदीप तुंगारे, गणेश भोईर, विकास मोरे यांनीदेखील शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला. आमच्यावर विश्वास ठेवून तुम्ही पक्षात प्रवेश केला आहे, त्या विश्वासाला तडा जाऊन देणार नसल्याचे प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.

## सचिन वाझे यांना जामीन मंजूर

त्यांच्यावर उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया या निवासस्थानाच्या बाहेर जिलेटिनच्या कांड्या ठेवल्याचा आणि धमकीचा आरोप आहे. तसेच मन्सुख हिरेन हत्या प्रकरण आणि १०० कोटींच्या खंडणी प्रकरणात ते आरोपी आहेत. दरम्यान, खंडणीच्या गुन्ह्यात बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांना विशेष सीबीआय न्यायालयाने गेल्या वर्षीच जामीन दिला होता. परंतु, इतर दोन गुन्ह्यांत आरोपी असल्याने त्यांचा तुरुंगवास लांबला. मे महिन्यांत त्यांनी पुन्हा अर्ज करून जामीनाची मागणी केली होती. परंतु, तेव्हाही त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावण्यात आला.

## किरकोळ वादातून दोघांवर जीवघेणा हल्ला

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार राजेश कारिया असे या हल्लेखोर मालकाचे नाव आहे. शहरात त्यांचे नादब्रम्ह नावाचे इडली विक्रीचे दुकान आहे. या दुकानात सायली मार्कील व अक्षता दळवी गेल्या वर्षभरापासून कामाला आहेत. त्यांनी काम सोडून देण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी दुपारी त्या कारिया यांना भेटल्या. तसेच पगाराची मागणी केली. कारीया यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये पगार देईन सांगत ते देण्यास टाळाटाळ केली. त्यावरून कारीया यांनी आपल्याकडे असलेल्या चाकूने हल्ला केला.


### दस्तऐवजाच्या मसुद्यास हरकत घेण्याविषयी नोटीस
### नोटीस

(आदेश २१, नियम ३४)

अलिबाग येथील मा. वानखडे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर अलिबाग यांचे न्यायालयात.

दरखास्त वादी तर्फे वकील
श्री.एस.वाय. बारटक्के
नियमित दरखास्त क्र.... ०६/२०२१
ने.ता. २५/११/२०२४
निशाणी :- २४/ड

श्री. भानुदास काशिनाथ बळी ..... ) द. वादी
वय ४८ वर्षे, धंदा शेती व नोकरी, )
मु. नवीन पनवेल व मु. थेरोंडा, )
पो. चौल, तालुका अलिबाग, )
जिल्हा रायगड
विरूद्ध
श्रीमती जयश्री जुगतराम बळी व २ ..... ) दरखास्त प्र. वादी
प्रति,
१) श्रीमती जयश्री जुगतराम बळी
वय ५५ वर्षे, धंदा गृहिणी,
२) कु. श्रद्धा जुगतराम बळी
वय २३ वर्षे, धंदा नोकरी,
३) श्री. ओंकार जुगतराम बळी
वय २० वर्षे, धंदा शिक्षण,
सर्व रा. हर्ष बिल्डींग, अे विंग
दुसरा मजला, रूम नं. २०३,
पांचाळ नगर, शिवसेना शाखेच्या बाजूला,
नालासोपारा (पश्चिम) वसई, जि. ठाणे, दरखास्त प्रति वादी
यांस....

यात याखाली निनिर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख. ज्याचा मसुदा यासोबत जोडला आहे. न्यायालयाने तुमच्या वतीने करून द्यावा म्हणून वरील दाव्यातील हुकूमनामा धारक श्री. भानुदास काशिनाथ बळी याने तारीख ०३ माहे जुलै सन २०२४ रोजी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे. आणि उक्त अर्जाच्या सुनावणीसाठी तारीख २५ माहे नोव्हेंबर सन २०२४ ही नेमण्यात आली आहे व उक्त दिवशी हजर राहण्याची व उक्त मसुद्याबाबतची कोणतीही हरकत लेखी नमूद करण्याची तुम्हाला मोकळीक आहे. याची दखल घ्यावी.

**मालमत्तेचे वर्णन**

| ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | गाव |
|---|---|---|---|
| ६३० | ०-५७-६<br>पो.ख. ०-१५-४ | १-२९ | चौल उ. भाग,<br>ता. अलिबाग<br>जि. रायगड |

आज दिनांक २२ माहे ऑक्टोबर सन २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- सही/-
कनिष्ठ लिपिक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर दिवाणी न्यायालय व. स्तर
अलिबाग अलिबाग
दिनांक : २२/१०/२०२४

**जाहीर खरेदीखत**

अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर साो. यांचे न्यायालयात

दरखास्त वादी तर्फे वकील :-
ॲड.एस.वाय. बारटक्के
नियमित दरखास्त क्र. ०६/२०२१
नेता. २५/११/२०२४
निशाणी क्र. २५/ड

खरेदीखत आज दिनांक २२ माहे एप्रिल सन २०२४ रोजीचे.

मौजे-चौल उत्तर भाग, ता. अलिबाग, जि. रायगड व ग्रामपंचायत चौल हद्दीतील येथील गट नं. ६३०, क्षेत्र ०.७३.० हे.आर. आकार रू. १.२९ पैसे, पैकी दुसरेपक्षी यांचे अविभक्त १/८ हिश्श्या संदर्भातील मिळकतीचे.

ठरली किंमत रूपये १,८५,०००/- (रूपये एक लाख पंचाऐंशी हजार मात्र)
सरकारी किंमत रू. ......./- (अक्षरी रूपये .................... मात्र)
मुद्रांक रूपये .............../- (अक्षरी .................... मात्र)

श्री. भानुदास काशिनाथ बळी ............. ) खरेदीखत लिहून घेणार
वय ६१ वर्षे, धंदा-शेती व निवृत्त ) एकपक्षी
मु. नवीन पनवेल व मु. थेरोंडा )
पो. चौल, तालुका अलिबाग )
जिल्हा रायगड
यांसी
०१) श्रीमती जयश्री जुगतराम बळी )
वय-५५, धंदा-गृहिणी, ) खरेदीखत लिहून घेणार
०२) कु. श्रद्धा जुगतराम बळी ) दुसरेपक्षी
वय-२३, धंदा-नोकरी,
१) श्री. ओंकार जुगतराम बळी )
वय २० वर्षे, धंदा शिक्षण, )
सर्व रा. हर्ष बिल्डींग, अे विंग )
दुसरा मजला, रूम नं. २०३, )
पांचाळ नगर, शिवसेना शाखेच्या बाजूला )
नालासोपारा (पश्चिम) वसई, जि. ठाणे )
तर्फे कोर्ट कमिशनर
श्री. .................... )
वय- धंदा वकिली ) खरेदीखत लिहून घेणार
मु. ............... ) दुसरेपक्षी
ता. .............. जि. रायगड )

कारणे दुसरेपक्षी खरेदीखत लिहून देतात ते खालीलप्रमाणे :-

०१) तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व ता. अलिबाग, जि. रायगड, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबाग, मौजे चौल उत्तर भाग येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत.

| मौजे | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| चौल उत्तर भाग | ६३० | ०.७३.० | १.२९ |

सदरहू मौजे चौल उत्तर भाग गट नं. ६३० या मिळकतीपैकी ०.७३.० हे.आर. या क्षेत्राची मिळकत उभयपक्षी यांचे सहमालकीची सहकब्जे वहीवाटीची असून सदरहू मिळकत सरकार दप्तरी ७/१२ कोष्टकी उभयपक्षी यांचे नावे सहमालक म्हणून नोंदली आहे. सदरहू मौजे चौल उत्तर भाग गट नं. ६३० या मिळकतीपैकी दुसरेपक्षी यांचे १/८ हिश्श्याचे क्षेत्राची मिळकत या खरेदीखताचा विषय असून या मिळकतीस यापुढे सोयीच्या दृष्टीने 'सदरहू मिळकत' म्हणून संबोधण्यात येत आहे.

०२) दुसरेपक्षी यांनी स्वतःचे व कुटुंबाचे आर्थिक गरजेकरीता सदरहू मिळकत विक्रीस काढली होती. एकपक्षी हा दुसरेपक्षी यांचा जवळचा नातेवाईक असून एकपक्षी यांस शेतीची आवड आहे. त्यामुळे एकपक्षी यांस स्वतःचे उपयोगाकरीता अशाप्रकारचे मिळकतीची गरज असल्याने एकपक्षी यांनी दुसरेपक्षी यांची भेट घेऊन दुसरेपक्षी यांचे हिश्श्याची सदर मिळकत खरेदी करणेची तयारी व उत्सुकता दर्शविली होती. त्याप्रमाणे उभयपक्षी यांचे दरम्यान वाटाघाट होऊन दुसरेपक्षी यांनी सदरहू मिळकत एकपक्षी यांस उक्ती रूपये १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) या किंमतीस यांस कायम खरेदी देण्याचे नक्की केले होते.

०३) त्याप्रमाणे दुसरे पक्षी यांनी दिनांक ०८.१२.२००७ रोजी साक्षीदार यांचे समक्ष एकपक्षी यांचे लाभात रितसर साठेकरार करून दिला. साठेकराराचे वेळेस एकपक्षी यांनी दुसरेपक्षी यांस सदरहू मिळकतीचे खरेदी व्यवहारापोटी ठरलेल्या रूपये १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) या मोबदला रक्कमेपैकी रूपये १,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख मात्र) ही रक्कम रोख दिली असून रूपये ८५,५००/- (अक्षरी रूपये पंच्याऐंशी हजार पाचशे मात्र) ही रक्कम सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा अलिबाग कडील चेक क्र. ४०९९६६ अन्वये अदा केली आहे. अशाप्रकारे एकपक्षी यांनी दुसरेपक्षी यांस व्यवहारापोटी ठरलेली संपूर्ण रक्कम रूपये १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) ही रक्कम अदा केली आहे. भरण्याबाबत तक्रार नाही निराळे पावतीची गरज नाही. आता दुसरेपक्षी यांस एकपक्षी यांजपासून या व्यवहारापोटी कोणतीही रक्कम येणे बाकी नाही.

०४) सदर साठेकराराप्रमाणे दुसरेपक्षी यांनी एकपक्षी यांचे लाभात अंतिम नोंदणीकृत खरेदीखत करून दिले नाही. त्यामुळे एकपक्षी यांनी दुसरेपक्षी यांचेविरूद्ध दिनांक ०८.१२.२००७ रोजीचे साठेकराराची विशेष पूर्तता करून मिळणेकरीता अलिबाग मे. दिवाणी न्यायालयात रेग्युलर मुकदमा क्र. १२५/२०१२ दाखल केला होता. त्या दाव्यात एकपक्षी यांचे लाभात अंतिम निर्णय होऊन दुसरेपक्षी यांनी सदरहू मौजे चौल उत्तर भाग गट नं. ६३० या मिळकतीपैकी दुसरेपक्षी यांचे १/८ इतके हिश्श्याच्या क्षेत्राचे अंतिम खरेदीखत एकपक्षी यांचे लाभात करून देणेबाबतचा हुकूमनामा दिनांक ११.०७.२०१३ रोजी मा. दिवाणी न्यायालयामार्फत करण्यात आला.

०५) दुसरेपक्षी यांनी हुकूमनाम्याप्रमाणे एकपक्षी यांचे लाभात अंतिम खरेदीखत करून दिले नाही. सबब, एकपक्षी यांनी रेग्युलर मुकदमा क्र. १२५/२०१२ चे कामी झालेल्या हुकूमनाम्याची बजावणी करून मिळणेकरीता दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात रेग्युलर दरखास्त क्र. ०६/२०२१ दाखल केली. सदर दरखास्तीचे कामी एकपक्षी यांनी निशाणी क्र. ..... कडे केलेल्या अर्जावर मे. न्यायालयाने हुकूम करून कोर्ट कमिशनर म्हणून ॲड. श्री. ............ यांची नेमणूक करून कोर्ट कमिशनी याने सदरहू मिळकतीचे अंतिम नोंदणीकृत खरेदीखत एकपक्षी यांचे लाभात करून देणेबाबत आदेश केला. सबब, दुसरेपक्षी यांचे वतीने व करीता कोर्ट कमिशनर म्हणून ॲड. श्री. .......... सदरचे नोंदणीकृत खरेदीखत खालील अटी व शर्तीस अधीन राहून एकपक्षी यांचे लाभात लिहून देत आहोत.

०६) यापूर्वी दुसरेपक्षी यांस एकपक्षी यांचेपासून या व्यवहारापोटी ठरलेली संपूर्ण मोबदला रक्कम रूपये १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) ही रक्कम पोहोच झाली आहे. भरण्याबद्दल तक्रार नाही. निराळे पावतीची गरज नाही. आता दुसरेपक्षी यांस एकपक्षी यांचेपासून या व्यवहारापोटी काहीही येणे बाकी राहिलेले नाही. ठरलेली संपूर्ण रक्कम पोहोच झालेली आहे.

०७) साठेकराराप्रमाणे दुसरेपक्षी यांनी सदरहू मिळकतीपैकी त्यांचे हिश्श्याचे मिळकतीचा कब्जा एकपक्षी यांस खरेदीखताचे वेळेस देण्याचे मान्य केले आहे. प्रत्यक्षात आज रोजी सदरहू मिळकत एकपक्षी यांचेच कब्जात आहे. त्यामुळे या खरेदीखता अन्वये दुसरेपक्षी यांनी बेलिफ व संबंधित तलाठी यांचे मदतीने सदरहू मिळकतीवर दुसरेपक्षी यांचा असलेला शांततामय कब्जा सुरक्षित केला असून आज रोजी पुन्हा एकदा प्रत्यक्ष जागेवर जाऊन मिळकतीच्या हद्दी दर्शवून सदरचा कब्जा मान्य केला आहे. एकपक्षी यांचा सदरहू मिळकतीवर असलेला कब्जा या खरेदीखताने सुरक्षित केला असून या खरेदीखताअन्वये मिळकत एकपक्षी यांचे खास कब्जात दिली असल्याने आता या खरेदीखताने एकपक्षी हे सदरहू मिळकतीचे पूर्ण मालक झाले आहेत. यापुढे एकपक्षी यांनी सदरहू मिळकतीचा उपभोग आपले मर्जीनुरूप, मन मानेल त्याप्रमाणे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने घेत जावा. आता दुसरेपक्षी अगर त्याचे वालीवारस, भाऊबंद, असायनीज वगैरे अन्य कोणाचाही सदरहू मिळकतीशी कोणताही हक्क हितसंबंध राहिलेला नाही. एकपक्षी यांचे सदरहू मिळकतीवरील कब्जात व मालकी हक्कास मागावून कोणीही हिला हरकत केल्यास सदरची हरकत दुसरेपक्षी स्वखर्चाने दूर करून देतील. एकपक्षी यांस तोषीस लागू देणार नाही.

०८) या खरेदीखताने दुसरेपक्षी यांनी एकपक्षी यांस खरेदी दिलेली मिळकत दुसरेपक्षी यांचे खुद्द मालकीची असल्याने एकपक्षी यांचे लाभात सदर खरेदीखत लिहून देण्याचा अगर मिळकतीची विक्री करणेस दुसरेपक्षी यांस संपूर्ण अधिकार आहे. सदरहू मिळकत दुसरेपक्षी यांचे मालकी वहिवाटीची असून सर्व प्रकारचे बोजापासून उदा. गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लीज, वहिवाटीचे हक्क, वारसा वगैरे पासून निर्वेध असून दुसरेपक्षी यांनी सदरहू मिळकत कोणाकडेही कोणत्याही जडजोखमांत गुंतविलेली नाही वा फरोक्त दिलेली नाही. तसेच सदर मिळकत खरेदी देणेबाबत कोणाशीही व्यवहार ठरविला नाही किंवा साठेकरार लिहून दिला नाही. तसेच सदरहू मिळकत कोणत्याही कारणाकरीता संपादित अगर आरक्षित केली नाही. तसे नोटीफिकेशन नाही किंवा दुसरेपक्षी यांस नोटीस नाही. मात्र, मागावून सदर मिळकती संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद दुसरेपक्षी पदरखर्चाने दूर करून देतील. एकपक्षी यांस तोषीस लागू देणार नाही.

०९) सदर मिळकती संदर्भातील आजपर्यंतची सर्व सरकारी, निमसरकारी देणी, कर वगैरे दुसरेपक्षी यांनी भरणा केली आहे. काही देणे बाकी नाही. यापुढील सर्व सरकारी, निमसरकारी, देणी कर वगैरे एकपक्षी यांनी देत जावे. मागील कोणतीही बाकी निघाल्यास ती भरणेची जबाबदारी दुसरेपक्षी यांजवर आहे. सदरहू मिळकत एकपक्षी यांचे नावे होणेकरीता लागणारे अर्ज, जाबजबाब, सह्या वगैरे दुसरेपक्षी कोणताही टाळाटाळ न करता देखील व सदरहू मिळकत एकपक्षी यांचे नावे करून देतील. आता या खरेदीखताने एकपक्षी हे सदरहू मिळकतीचे संपूर्ण मालक झाले आहेत. आता सदर मिळकतीशी दुसरेपक्षी यांचा अगर त्यांचे वाली वारस, असायनीज वगैरे यांचा कोणताही संबंध राहिलेला नाही.

१०) उभयपक्षी यांचे दरम्यान या खरेदीखतात नमूद मिळकतीची एकंदरीत किंमत मोबदला रूपये १,८५,०००/- (अक्षरी रूपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) ही रक्कम इतकी ठरली आहे. मात्र, शासनाचे शिघ्रगणकानुसार सदरहू मिळकतीची ठरविलेली आधारभूत किंमत रूपये ......../- (अक्षरी रूपये.................... मात्र) होत आहे. त्याकरीता या खरेदीखतास रूपये........../- (अक्षरी रुपये .................... मात्र) चा स्टॅम्प लावला आहे.

११) येणेप्रमाणे खरेदीखत आज रोजी राजीखुशीने, अक्कल हुशारीने, स्वसंतोषे, मनावर कोणतेही दडपण नसताना या दस्तावरील मजकूर वाचून आपआपल्या सह्या करून उभयपक्षी यांनी पूर्ण करून ठेवला आहे.

खरेदीखत आज दिनांक २२.०४.२०२४ रोजीचे.

साक्षीदार :-
०१)...............................

श्री. भानुदास काशिनाथ बळी
खरेदीखत लिहून घेणार
(एकपक्षी)

०२) ................................

क्र. १ ते ३ तर्फे कोर्ट कमिशनर
श्री. ............................
खरेदीखत लिहून देणार
(दुसरेपक्षी)





























# गुलाल उधळण्याची भीष्म प्रतिज्ञा करा : ॲड. मानसी म्हात्रे

(पान १ वरुन)

रायगडातून लाल वादळ विधानसभेत येत आहे, हा निरोप या सभेतून महाराष्ट्राला पोहचवा. हिम्मत असेल तर लाल वादळाला अडवून दाखवा, असा इशारा ॲड. मानसी म्हात्रे यांनी दिला. त्या पुढे म्हणाल्या की, शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला ७५ वर्षांचा वारसा आहे. विधानसभा निवडणूकीकडे संपुर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. 'लडेंगे और जितेंगे' या भूमिकेतून काम करून येत्या २३ नोव्हेंबरला गुलाल उधळण्याची भीष्म प्रतिज्ञा करा, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले आहे.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, माजी आ. बाळाराम पाटील, प्रा. एस.व्ही जाधव, राजेंद्र कोरडे, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा तथा अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या उपाध्यक्षा वृषाली ठोसर, शेकाप राज्य विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षा साम्या कोरडे, पेण विधानसभा मतदार संघातील उमेदवार अतूल म्हात्रे, उरण विधानसभा मतदार संघातील उमेदवार प्रीतम म्हात्रे, ॲड. नीलम हजारे, ॲड. अशिष रानडे, अशोक प्रधान, संजना कीर, वैशाली पाटील, सतिश प्रधान, द्वारकानाथ नाईक, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, नागेश कुलकर्णी, उरणच्या सीमा घरत, जिल्ह्यातील शेकाप चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, नगरपरिषद, जिल्हा परिषद ग्रामपंचायत व विविध क्षेत्रातील आजी माजी पदाधिकारी, सभासद, शेकाप महिला आघाडीच्या पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला, तरुण वर्ग हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील शेकापचे उमेदवार कोण असणार, याची उत्कंठा शिगेला पोहचली होती. अखेर ही उत्कंठा मंगळवारी संपली. शेकापच्या जाहीर सभेत हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शेकापचे नेते जयंत पाटील यांनी चित्रलेखा पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. चित्रलेखा पाटील यांचे विधानसभा मतदार संघातील उमेदवारीसाठी नाव जाहीर होताच फटक्यांची आतषबाजी झाली. कार्यकर्त्यांनी जल्लोष करीत 'चिऊताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' असा जयघोष करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळा उत्साह निर्माण झाला होता.

## मतदारसंघात लाल वादळ

शेतकरी कामगार पक्षाची सभा दुपारी ३:00 वाजता असल्याने दुपारी १२:00 वाजल्यापासून कार्यकर्ते अलिबागला येण्यास सुरुवात झाली. काही कार्यकर्ते दुचाकीवर तर काही कार्यकर्ते टेम्पो, सितारा व चारचाकी वाहनातून निघाले. यावेळी 'शेतकरी कामगार पक्षाचा विजय असो' असा जयघोष प्रत्येकजण करत होता. दुचाकीसह सर्वच गाड्यांवर शेकापचा लाल बावटा रुबाबात डौलत होता. सायंकाळी ४:00 वाजण्याच्या सुमारास शेकाप भवन परिसर लाल वादळाने घोंघावला. शेकापचे नेते जयंत पाटील यांचे आगमन होताच कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. यादरम्यान, एक वेगळा आनंद कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला होतो.

# भाजपचा पडलेला सूर

राज्य निवडणुकीची अधिसूचना जारी झाली. आता उमेदवारांची लगीनघाई सुरू होईल. भाजपने रविवारी पहिली यादी जाहीर केली. गंमत अशी महायुतीचे जागावाटप जाहीर झालेले नाही. तरीही यांची यादी मात्र आली. लोकसभेच्या वेळी याच जागावाटपाच्या घोळामुळे नाशिक, ठाणे वगैरे जागा उशिरा जाहीर झाल्या. यावेळी त्या लवकर जाहीर करणार असे युतीवाले सांगत होते. गेले तीन महिन्यांपासून राज्यातल्या मिडियाला याखेरीज दुसरा काहीही विषय नाही. युतीत कोणाला किती जागा मिळणार याचेच अंदाज वर्तवणे चालू आहे. अमित शाह चार वेळा राज्यात येऊन गेले. संभाजीनगर, नागपूर, पुणे, मुंबई यांचे दौरे झाले. मग शिंदे, फडणवीस, पवार हे पन्नास वेळा दिल्लीत गेले. पण तरीही अजून घोळ चालूच आहे. अजित पवारांनी उमेदवारांची घोषणा न करता परस्पर काही जणांना एबी फॉर्म देऊन टाकले. भाजपने गेल्या वेळी १०५ जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे तेवढ्या जागांवर त्याचा दावा राहणार आहेच. यातल्याच बहुसंख्य आमदारांना पुन्हा तिकिटे देण्याची परवा घोषणा झाली. गुजरातेत भाजपने पूर्ण मंत्रिमंडळ बदलले होते. पहिल्यांदा निवडून आलेल्यांना मंत्री आणि मुख्यमंत्री केले होते. नंतर अनेकांची तिकीटे कापली होती. हरियाणातही अनेक विद्यमान आमदारांना डावलले होते. त्यामुळे महाराष्ट्रातले भाजपवाले देव पाण्यात घालून बसले होते. पण ९९ पैकी केवळ आठ-दहा जणांचेच तिकिट कापले गेले आहे. बाकी सर्व जुनेच आमदार आहेत. याचे कारण, भाजपची राज्यातील अवस्था बिकट आहे. लोकसभेला दणकून फटका बसला आहे. नरेंद्र मोदींच्या नावावर मते मिळतील याची हमी उरलेली नाही. उलट महाराष्ट्रात त्याचा उलटाच परिणाम होण्याची शक्यता आहे. एकूणच सरकारच्या कारभारावर जनता नाराज आहे. अजितदादांना युतीत घेतल्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. शिवाय, आरक्षणाच्या आंदोलनांमुळे मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी अशा सर्वच समुदायांमध्ये असंतोष आहे.

### आत्मविश्वास गमावला

या असंतोषाचा युतीला फटका बसणार आहे. मात्र सर्वात मोठा पक्ष आणि कारभारी म्हणून भाजपला याचे अधिक नुकसान होणार आहे. मराठा आरक्षणवाले जरांगे तर भाजप आणि फडणवीस यांना पाडा असा मंत्र जपताहेत. त्याचा फटका मराठवाड्यात व काही प्रमाणात नाशिक तसेच पश्चिम महाराष्ट्रातील दोन-तीन जिल्ह्यांमध्ये बसणार आहे. विदर्भामध्ये काँग्रेसची स्थिती बरी आहे. मुस्लिम, दलित, आदिवासी यांचे मतदान काँग्रेसलाच होण्याची शक्यता अधिक आहे. पश्चिम महाराष्ट्रात शरद पवार यांच्याकडे सध्या सर्व पक्षांमधून येणाऱ्यांची रीघ लागलेली आहे. मुंबईत लोकसभेला जे झाले ते पाहता फार मोठे यश मिळेल असा भरवसा देता येत नाही. या स्थितीत भाजपने सध्या पूर्णपणे आत्मविश्वास गमावलेला दिसतो. यावेळच्या निवडणुकीत आपल्याला युतीलाच निवडून आणावे लागेल असे अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना सांगितलेले आहेच. त्यांच्यापुढे २०२९ ला स्वतःच्या बळावर निवडून येऊ असे गाजर दाखवले आहे. आता बहुसंख्य आमदारांना पुन्हा तिकिटे देणे हाही आत्मविश्वासाच्या अभावाचाच नमुना आहे. जेव्हा आर्थिक मंदी असते तेव्हा कोणतीही कंपनी नवीन उत्पादन बाजारात आणण्याऐवजी आधीच मार्केटमध्ये आहे व ज्याचे नाव आधीपासूनच लोकांपर्यंत पोचलेले आहे अशा उत्पादनाचीच विक्री वाढवण्याचा प्रयत्न करतात. भाजपचा हा त्यातलाच प्रयत्न आहे. अर्थात त्यालाही कितपत यश मिळेल हे सांगता येत नाही. कारण, सध्या शिंदे शिवसेनेला भलताच आत्मविश्वास आला आहे. आम्हाला १२० जागा लढू द्या, आम्ही शंभर जिंकून आणतो असे एकनाथ शिंदे यांनी अमित शाह यांना सांगितल्याची चर्चा आहे. भाजपच्या उमेदवारांचा खर्च करण्याचीही तयारी शिंदे यांनी दाखवली आहे अशीही एक चर्चा आहे. या चर्चा म्हणजे केवळ अफवा आहेत असे मानले तरीही शिंदे गट आणि भाजप यांच्यातील सध्याचे संबंध कसे आहेत ते त्यातून दिसते. आजपर्यंत मोठा भाऊ म्हणून दिल्लीतून भाजपवाले दादागिरी करीत होते. आता त्यांना शिंदे यांच्या कलाने घ्यावे लागत आहे.

### सुसरबाई तुझी पाठ मऊ

अर्थात, शिंदे सेनेचा फुगा फुटणार आहेच. मात्र भाजपचे हात सध्या इतके दगडाखाली आहेत की त्यांना सुसरबाई तुझी पाठ मऊ म्हणून यांना सहन करावे लागत आहे. शिंदे सेनेला आपल्याकडच्या पैशांचा माज आला आहे. त्या जोरावर आपण काहीही विकत घेऊ शकतो असा त्यांचा समज झाला आहे. मात्र असे विकत घेण्याची भाषा करणाऱ्याला मतदार योग्य तो धडा नेहमीच शिकवत असतात. दुसरे म्हणजे या पैसे फेकणाऱ्यांची चलाखीही आता उघड होऊ लागली आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनेखाली काही जणींना दीड हजार रुपये मिळाले आहेत हे खरे. पण त्याच वेळी बाजारातील तेल, तूप, डाळी, धान्य सर्व काही भयंकर महाग झाले आहे. जीएसटी वाढला आहे. स्टॅम्प ड्यूटी वाढवून ठेवली आहे. आता बहिणींना आपल्या भावाच्या नावे माहेरच्या जमिनीचे हक्कसोडपत्र करायचे तरी शंभरच्या ऐवजी पाचशे रुपयांचा स्टॅम्प लावावा लागणार आहे. एसटीमध्ये महिलांना निम्म्या तिकिटात प्रवास करण्यात आला आहे. पण मुळात एसटीच्या गाड्याच कमी झाल्या आहेत. त्या आणखी कमी होणार आहेत. आणखी काही महिन्यांनी या सेवा आणि सवलती दोन्हीही बंद पडतील अशी अवस्था आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे पगार द्यायचेही वांदे आहेत. शेतकऱ्यांना वीजबिल माफ वगैरे सरकार सांगते. पण परतीच्या पावसाने नुकसान झालेल्यांना त्याचा काहीही उपयोग नाही. मुलांचे शिक्षण भयंकर महाग झाले आहे. डॉक्टरकडे जाताना दहा वेळा विचार करावा लागतो. यासाठी काहीही करायच्या ऐवजी या सरकारने निव्वळ योजनांच्या प्रचाराच्या जाहिरातींवर अडीचशे कोटी रुपये खर्ची घातले. या अडीचशे कोटी रुपयांमध्ये किती शाळा किंवा इस्पितळांमधील छोटी कामे वा दुरुस्त्या झाल्या असत्या. असो. आपली हालत काय होणार आहे याची महायुतीला पुरती कल्पना आली आहे. त्यामुळेच भाजपचा आवाज खाली आला आहे आणि तिकिटवाटपात सावध पवित्रे घेतला गेला आहे.

विचार

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी

*राष्ट्रभक्ती, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार आणि नि:स्वार्थ समाजसेवा याच ध्येयाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. गेल्या शंभर वर्षांच्या काळात या संघटनेने आपला मूळ ध्येयवाद, उद्देश आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत कार्याचा चौफेर विस्तार केला, पण पूर्ण स्वावलंबी, शक्तिशाली, आत्म निर्भर राष्ट्रनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या कोट्यवधी समर्पित स्वयंसेवकांची फळीही निर्माण केली.*



वासुदेव कुलकर्णी

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रभक्ती, भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि प्रसार आणि नि:स्वार्थ समाजसेवा याच ध्येयाने स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष आहे. गेल्या शंभर वर्षांच्या काळात या संघटनेने आपला मूळ ध्येयवाद, उद्देश आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूलभूत कार्याचा चौफेर विस्तार केला, पण पूर्ण स्वावलंबी, शक्तिशाली, आत्मनिर्भर राष्ट्रनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या कोट्यवधी समर्पित स्वयंसेवकांची फळीही निर्माण केली. संपूर्ण देशात राष्ट्राभिमानाच्या जागृतीबरोबरच भारताला मातृभूमी मानणारे सर्व हिंदू हे भारतीय अशी हिंदुत्वाची व्यापक भूमिका घेत वर्ण, जातिभेदविरहीत एकजुट करत हिंदू समाजनिर्मितीसाठी विचारप्रबोधनही केले. सांस्कृतिक संघटनेने आपल्या ध्येयप्राप्तीसाठी सुरू केलेल्या संघ परिवारातल्या भारतीय किसान संघ, सेवाभारती, संस्कृतभारती, स्वदेशी जागरण मंच, वनवासी कल्याण आश्रम, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, राष्ट्रसेविका समिती, संस्कार भारती अशा विविध संस्थांद्वारे संस्कृती संवर्धनाबरोबरच गेली हजारो वर्षे उपेक्षित आणि वंचित राहिलेल्या कोट्यवधी आदिवासींना मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठीही समर्पितपणे कार्य केले. कोणत्याही मोहमयी पदाची अपेक्षा न ठेवता संघाच्या राष्ट्रीय विचारसरणीनुसार एक कोटीच्या आसपास स्वयंसेवक कार्य करतात. अशाच प्रकारे कार्य करणाऱ्या कोणत्याही संघटनांपेक्षा हे नक्कीच उजवे असे चित्र आहे. संघटनेचे सुमारे पन्नास हजार प्रचारक येथे राष्ट्रसेवेला आपले जीवन अखंडपणे अर्पण करत असतात. त्यांना ना पैशाची अपेक्षा असते ना घरदाराची. आपल्यामागे असलेल्या घराची व्यवस्था कोणी लावून दिली तर हे कार्यकर्ते अगदी मणिपूर, मेघालय, आसामसारख्या दूरस्थ असलेल्या प्रदेशात जोखमीचे काम करत असतात.

संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावर लावलेल्या रोपट्याचा आता वटवृक्ष झाला आहे, पण साऱ्या जगभरात या वटवृक्षाच्या फांद्या आणि पारंब्यांचा विस्तारही झाला आहे. काळानुसार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संघ परिवाराशी संलग्न विविध संस्थांची स्थापना केली आणि या संस्थांनीही समाजसेवेचा नवा मानदंड निर्माण केला. भूकंप, महापूर यासह विविध नैसर्गिक आपत्तीच्या संकटातही संघाचे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते धावून जातात आणि आपत्तीग्रस्तांना निस्वार्थपणे सहाय्य करतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही फॅसिस्ट, कडवे हिंदुत्वनिष्ठ आणि प्रतिगामी विचारांची, मनुवादाचे म्हणजेच जातीय वर्णवादाचे समर्थन करणारी संघटना असल्याची टीका या वाटचालीमध्ये सातत्याने होत असली तरी प्रत्यक्षात मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवाराच्या संस्थांनी जातीभेदविरहित एकजुटीनेच समाजसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. चारित्र्य, शीलसंवर्धनाचे प्रशिक्षण देत भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्यांचा आदर्श जपत संघाने सामाजिक कार्याचा विस्तार करतानाच धर्मांध मुस्लीम आणि धर्मवेड्या ख्रिश्चन शक्तींना कडाडून विरोध केला आहे. भारतात आदर्श आणि चारित्र्यशील पिढ्या घडाव्यात, यासाठीच गेली शंभर वर्षे संघाचे हे सामाजिक आणि राष्ट्रसेवेचे कार्य अखंड सुरू आहे.

प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राजकारणात सक्रिय सहभाग घ्यायचा नाही, हे धोरण स्वीकारले आणि ते अंमलातही आणले. पण, स्वातंत्र्य मिळाल्यावर संसदीय लोकशाहीत तेव्हाच्या प्रबळ काँग्रेस पक्षाला प्रबळ ठरणारा राजकीय पर्याय असावा, ही विचारसरणी माजी सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी यांनी स्वीकारली आणि प्रखर राष्ट्रवादी, हिंदुत्ववादी आणि बलशाली राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या राजकीय पक्षाच्या स्थापनेला मान्यता दिली आणि या नव्या पक्षाच्या व्यापक संघटनकार्यासाठी संघाचे समर्पित कार्यकर्तेही नव्या पक्षाला दिले. डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी स्थापन केलेल्या संघविचाराच्या आणि व्यापक राष्ट्रीय विचाराने राष्ट्रीय पक्षाची बांधणी करणाऱ्या 'भारतीय जनसंघ' या राष्ट्रवादी पक्षाच्या संस्थापकांमध्ये दीनदयाळ उपाध्याय, बलराज मधोक आणि नानाजी देशमुख या कुशल संघटकांचा आणि अटलबिहारी वाजपेयी या प्रखर राष्ट्रवादी विचारांच्या नेत्याचाही सहभाग झाला. २१ ऑक्टोबर १९५१ या दिवशी भारतीय जनसंघाची स्थापना झाली आणि बलशाली भारताच्या निर्मितीसाठी हिंदूराष्ट्रवाद, हिंदुत्व, अखंड मानवतावाद, आर्थिक राष्ट्रवाद, राष्ट्रीय सांस्कृतिक परंपरांचे जतन आणि संवर्धन या ध्येयवादाने काँग्रेसला राष्ट्रवादी राजकीय पक्षाचा पर्याय दिला गेला. १९५३ मध्ये पक्षाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा काश्मीरमध्ये संशयास्पद मृत्यू झाला आणि जनसंघावर संघाच्या नेत्यांचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले.

साम्यवादाला आणि धर्मांध मुस्लीम शक्तीला कडाडून विरोध करणारे जनसंघाचे नेते आणि कार्यकर्ते यांना आपल्याला देशाच्या राजकारणात अखंड संघर्ष करावा लागणार याची पूर्ण खात्री होती. आपली पिढी देशव्यापी संघटनकार्यासाठीच खर्ची पडणार, याची खूणगाठ बांधूनच जनसंघाच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पक्षाचा विस्तार करण्यासाठी अखंड परिश्रम घेतले. प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी काँग्रेसच्या विचारांशी झुंजही दिली. समान नागरी कायदा लागू व्हावा आणि काश्मीरमध्ये लावण्यात आलेले राज्यघटनेचे ३७० वे कलम रद्द केले जावे, अशी मागणी पक्षाने १९६७ मध्ये केली. जनसंघाचे माजी अध्यक्ष दीनदयाळ उपाध्याय यांच्या कारकिर्दीत पक्षाने एकात्म मानवतावादी विचारधारेचा स्वीकार केला. समाजवादी नेते राममनोहर लोहिया हेही उपाध्याय यांच्या विचारांशी सहमत होते. काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी संपवण्यासाठी १९६७ मध्ये विरोधी पक्षाच्या संयुक्त विधायक दल या नव्या आघाडीमध्ये जनसंघ सामीलही झाला. या प्रयोगाला काही राज्यांमध्ये यश मिळाले, पण हा प्रयोग भिन्न विचारसरणीच्या राजकीय पक्षांच्या संघर्षात यशस्वी ठरला नाही. स्वदेशी, गोहत्याबंदी, यासह आक्रमक हिंदुत्वाचा प्रचार करणाऱ्या जनसंघाची वाटचाल 'एकला चलो रे' धाटणीची होती. उपाध्याय यांच्या खुनानंतर बलराज मधोक, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी हे नेतेही अध्यक्ष झाले. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात यासह मोजक्याच राज्यात जनसंघाची पाळेमुळे रुजली. १९६७ मधल्या निवडणुकीत जनसंघाने लोकसभेच्या ३५ जागा जिंकल्या.

कोणत्याही परिस्थितीमध्ये मूळ ध्येयाशी तडजोड न करता जनसंघाची वाटचाल सुरू राहिली. सत्तेसाठी संधिसाधूपणा आणि भ्रष्ट तडजोडी न केल्याने जनसंघाचा जनाधार हळूहळू वाढत गेला. जनसंघ हा प्रखर राष्ट्रवादी पक्ष असल्याचा आणि या पक्षातले नेते समर्पित ध्येयवादी असल्याचा विश्वास जनमानसात होता. पक्षात शिस्तही प्रभावी होती. भारतीयीकरणाचा आग्रह धरणाऱ्या बलराज मधोक यांनी जनसंघावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव वाढत असल्याचे मत व्यक्त करत संघाच्या प्रभावातून जनसंघ मुक्त केला पाहिजे, असा विचार मांडला तेव्हा पक्षाचे अध्यक्ष असलेल्या याच मधोक यांची पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. या उलट आता आम्हाला संघाच्या कार्यकर्त्यांची आवश्यकता उरलेली नाही, हे पहिल्यांदाच पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा जाहीरपणे म्हणाले, तेव्हा त्यांना पक्षाने जाब विचारला नाही. मधोक बोलले तेव्हा जनसंघावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची असलेली पकड अधिक मजबूत, भक्कम आणि कायम झालेली होती आणि मधोक हे संघाच्या शीर्षस्थानावरून दूर गेले होते. लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांती आंदोलन सुरू केल्यावर जनसंघानेही त्यात सक्रिय सहभाग आंदोलनात घेतला. १९७५ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशावर आणिबाणी लादली तेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केंद्र सरकारने बंदी तर घातलीच, पण संघ आणि जनसंघाच्या बहुतांश नेत्यांना आणि लाखो स्वयंसेवकांना तुरुंगात डांबले.

लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी जनसंघाच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी केलेल्या अपूर्व त्यागामुळे त्यांची जनमानसातली प्रतिमा अधिक उजळून निघाली.

१९७७ मध्ये आणीबाणी उठवून लोकसभेच्या निवडणुका जाहीर केल्या जाताच सर्वच विरोधी पक्षांनी आपल्या स्वतंत्र राजकीय पक्षांचे विसर्जन करून जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'जनता' पक्षात घरोबा केला. तेव्हा जनसंघही विसर्जित झाला. त्यावेळी स्वतंत्र, जनसंघ, समाजवादी, संघटना काँग्रेस हे प्रमुख पक्ष या नव्या पक्षात आपले स्वतंत्र अस्तित्व सोडून दाखल झाले. त्या निवडणुकीमध्ये जनता पक्षाला बहुमत मिळाले. वाजपेयी, अडवाणी यांच्यासह काही नेते जनता पक्षाच्या केंद्र सरकारमध्ये मंत्रीही झाले. देशात हे पहिल्यांदाच घडत होते. पंतप्रधानपदाच्या संघर्षामुळे आणि गटबाजीने जनता पक्षाचे सरकार कोसळले तरी जनसंघाचे माजी कार्यकर्ते आणि नेते जनता पक्षातच राहिले. त्यानंतर आजपर्यंत संघाचा इतिहास हा संघटनात्मक सामाजिक कार्यामध्ये वाहून घेऊन काम करण्याचा राहिला आहे.

आजकाल

# सर्व काही गुजरात आणि अडानीसाठी

सूरज सामंत

युपी मधल्या काशी विश्वनाथ मंदिराचा प्रसाद आता गुजरात मधली कंपनी बनवणार.

म्हणजे युपीमधल्यांना साधा प्रसाद सुद्धा बनवता येत नाही? तो सुद्धा गुजरात मधून बनवून घ्यायचा?

नवभारत टाइम्सच्या रिपोर्टवर, ५ लोकल वेंडर्स प्रसाद बनवत होते आणि प्रत्येकाकडे ६० ते ७० स्थानिक महिला काम करत होत्या.

त्यांचा रोजगार आणि संधी ओरबाडून नेले, गुजरातला.

शिवाय २०० ग्राम लाडूचा १०० वरून १२० करतायत असं दैनिक भास्कर ने म्हटलं आहे.

त्या वेंडर्सकडील महिलांना मीडियासोबत बोलण्यास मनाई केली आहे. (महिलांनी दैनिक भास्करला तसे सांगत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर आहे)

जुन्या वेंडरने प्रसाद विकण्याचा प्रयत्न केला तर त्याच्यावर झाली (महादेव लाल पेढा वाला)

पण या पॅटर्नचं महाराष्ट्रातील लोकांना आश्चर्य वाटायला नको,

महाराष्ट्राला ओरबाडून गुजरातकडे सर्व नेत असताना महाराष्ट्राने अगदी थंडपणे बघितले आहेच,

साधं उदाहरण म्हणजे... महाराष्ट्रात मैदा, साखर वगैरे वाटत होते ते सुद्धा गुजरात मधून विकत घेतलेले.

जणू इथल्यांना बनवता येत नाही, पॅकेजिंग करता येत नाही.

शिवाय महाराष्ट्रातल्या राजकीय नेत्यांनी तर गुजरातची वकिली सुद्धा केली आहे.

मग ते महाराष्ट्रातून जाणारे उद्योग असो, पाणी असो किंवा बुलेट ट्रेन चा भार....

महाराष्ट्राचा ऊस गोड लागल्याने आता सगळा देशच मुळासकट उपटून गुजराती निवडकांना श्रीमंत करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

कर्नाटकमध्ये अमूल आणण्याचा प्रयत्न केला, तिरुपतीमध्ये प्रयत्न केला...

तिथल्या स्थानिकांच्या अस्मिता अजून तरी जाग्या असल्याने तो प्रयत्न सध्या तरी अयशस्वी ठरला आहे,

पण महाराष्ट्रात काय उपयोग.

डोळ्यावर द्वेषाची आणि फेकूभक्तीची पट्टी बांधली आहे ना.

......

आचारसंहिता लागण्याआधी अडाण्याची सेवा करण्यासाठी कंबर कसली होती.

एकाच महिन्यात मुंबई मधील ३ भूखंड ज्यांची किंमत हजारो कोटी आहे आणि ज्याच्या जीवावर भविष्यात लाखो कोटींचे व्यवहार होणार,

ते अडाण्याचा पदरात टाकण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज मंडई, मलबार हिल ची जागा आणि वरळीच्या प्लांट चे लिलाव होणार, तर त्या जागा कोणाच्या पदरात पडणार हे सांगायला फार डोकं लावण्याची गरज नाही. सरकारचं काम जणू अडाण्याची आर्थिक प्रगती करून देणे एवढेच असावे.

हे सत्तेत नसताना कांजूरमार्गची जागा मेट्रो साठी देता येणार नाही असं म्हणालेले. आठवतंय?

तिथे फक्त कारशेड बनणार होती.

आता मात्र तिथली जागा सुद्धा अडाण्याचा घशात.

म्हणजे तिथे मोठे टॉवर्स बनतील.

सांगा, कारशेड मध्ये किती लोकं जाणार होते? आणि टॉवर्स मध्ये किती लोकं येतील?

म्हणजे निसर्गाचा सत्यानाश करून,

सी व्ह्यू जागा गुजराती उद्योजकाच्या घशात घालण्यासाठी सगळा अट्टाहास केला.

या नाही तर त्या मार्गाने मुंबई आणि हळूहळू महाराष्ट्र ढपसवायचा हा प्लॅन...

आणि इथल्या भक्तांना द्वेषाचा गांजा दिलाय ना.

.....

बिष्णोई गँगने सलमानच्या घराजवळ फायरिंग केली, नंतर बिष्णोई गँग ने बाबा सिद्दीकीची हत्या केली, नंतर

बिष्णोई गँग ने सलमान कडे ५ कोटी मागितले.

हा प्लॉट तर अनेकदा दिसला आहे.

उदाहरणार्थ,

ईडी ने रेड टाकली,

ईडी ने अटक केली,

इलेक्टोरल बॉण्ड्स ची खरेदी झाली,

अजून एक,

आयटी ने रेड टाकली,

आयटीने दुसऱ्या कंपनीवर गुन्हा दाखल केला,

कंपनी अडाण्याने विकत घेतली.

खूप आहेत.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२३ ऑक्टोबर**

**१८९१:-** सहकारी चळवळ व ग्रामोद्योग या विषयावर लेखन करणारे लेखक, गांधीवादी विचारवंत आणि भारतीय सहकारी चळवळीचे एक प्रवर्तक वैकुंठ लल्लुभाई मेहता यांचा जन्म. **१८९८:-** जुन्या पिढीतील एक लेखिका राधाबाई पांडुरंग आपटे यांचा जन्म. **१९२३:-** 'श्रीविद्या प्रकाषन' चे संस्थापक संचालक दामोदर दिनकर तथा 'मधुकाका' कुलकर्णी यांचा जन्म. १९६८ साली स्थापलेल्या प्रकाशन संस्थेमार्फत ह्यातभर (२००० पर्यंत) त्यांनी सुमारे एक हजार पुस्तके प्रकाशित केली. परदेशांत मराठी पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यांचे इव्हेन्ट त्यांनीच सुरु केले. य. दि. फडके, रा. चिं.ढेरे आदी अभ्यासकांची पुस्तके मिळवण्यांतही ते यशस्वी झाले. 'प्रकाशकनामा' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले आहे. **१९२९:-** कवी मनोहर महादेव देषपांडे यांचा जन्म. 'वनफूल' ह्या संग्रहातील 'वनफूल ज्याला आवडते धूळ' या सारख्या साध्या परंतु चिंतनशील आशयामुळे रसिकांनी त्यांच्या काव्यांना दाद दिली. 'अंतर्देषी' हा त्यांचा आणखी एक काव्यसंग्रह. 'अव्यक्तांचा शोध व निर्लेप समाधानता' ही त्यांच्या काव्याची खरी ओळख. **१९३८:-** मराठी साहित्याचे जाणकार आणि यावर वर्तमानपत्रातून लेखन करणारे लेखक मदन ल. चौबे यांचा जन्म. **१९३८:-** विज्ञानविषयक पुस्तकांचे लेखक, अनुवादक अशोक विठ्ठल पाध्ये यांचा जन्म. त्यांनी लिहिलेल्या 'डीएनए चे गोलगोल जिने' या पुस्तकाला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. याषिवाय काही अनुवादित पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९६०:-** लेखिका नीरजा यांचा जन्म. त्यांच्या साहित्य संपदेत 'निरन्वय', 'वेणा', 'स्त्रीगणेशा', 'निरर्थकाचे पक्षी', 'मी माया थारोळ्यात' हे काव्यसंग्रह, 'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती', 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' हे कथासंग्रह, 'बदलत्या चौकटी', 'चिंतनशलाका' हे ललित लेखसंग्रह, 'निद्राहीन रात्रीच्या कठोर कातळावर- निवडक रजनी परुळेकर' याचे संपादन, 'मुंबईच्या कविता (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक एम ए च्या अभ्यासक्रमातील काव्यसंग्रहाचे संपादन), 'महाराष्ट्र साहित्य मंडळाचा 'निरन्वय' ला पुरस्कार. १९७२:- कवी, कथाकथनकार आणि नव्या पिढीचे बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांचा जन्म. 'जीवन गाणे' हा चारोळीसंग्रह. 'गंमत गाणी' या बालकाव्य संग्रहास महाराष्ट्र शासनाचा बालसाहित्य पुरस्कार. याशिवाय 'बोधाई अक्षरांची फुले', 'मज्जाच मज्जा' आदी बालकाव्यसंग्रह प्रकाशित. पुस्तक समीक्षक ही त्यांची आणखी एक साहित्यिक ओळख. **२००५:-** सुमारे १०० मराठी ग्रामीण आणि तमाशापटांचे पटकथाकार तसेच कथाकार, चित्रपटनिर्माते व दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांचे निधन. पाच नाटके, तीन कथासंग्रह आणि व्यक्तिचित्रांचे तीन संग्रह या त्यांच्या पुस्तकांपेक्षा 'पाटलाचं पोर' हे आत्मचरित्र अधिक गाजले. या आत्मचरित्रातून मराठी चित्रपटांच्या चार दशकांचे अंतरंग उलगडते, अशी दाद मिळाली होती.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## लोकसंसद

### फटाकेबंदीचा स्वागतार्ह निर्णय

सर्व सणांचा राजा मानला गेलेल्या आणि लहानथोर प्रत्येकासाठी सकारात्मक उर्जा घेऊन येणाऱ्या ज्या सणाची आपण सर्वजण वाट पाहत आहोत तो दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. खरे तर दिवाळी जवळ येत असताना सर्वत्र उत्साहाला, आनंदाला उधाण येते. सुख, समाधानाची बरसात होते. पण एका गोष्टीमुळे या आनंदोत्सवावर विरजण पडते ती म्हणजे कानठळ्या बसवणारे फटाके. फटाके फोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनि प्रदूषण, वायू प्रदूषण होतेच, परंतु रुग्णांना, लहान बालकांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास होतो. फटाक्यांमुळे हवेत सल्फर डाय ऑक्साइड, कार्बन डाय ऑक्साइड, आणि मोनो ऑक्साइड आणि इतर काही विषारी पदार्थ मोठ्या प्रमाणात पसरतात. या पार्श्वभूमीवर, वायू प्रदूषण रोखण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील टाळसुरे या गावाने दिवाळीत फटाकेबंदीचा निर्णय घेतला असून फटाक्यांऐवजी तो खर्च शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी आणि गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी करण्याचा निर्णय गावाने घेतला आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

### दारात मातीच्या पणत्या लावा!

दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठा रंगीबेरंगी कंदील, पणत्या, विजेची तोरणे, रांगोळीचे रंग यांनी सजल्या आहेत. जीवनातील निरुत्साह, निराशा आणि नकारात्मकतेच्या अंधकाराकडून उत्साहाच्या, चैतन्याच्या आणि सकारात्मकतेच्या प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाला हजारो वर्षांचा इतिहास आहे. दिवाळीत मातीच्या पणत्यांमध्ये तेलाची वात लावून दारात दोन्ही बाजूंना, दारात काढलेल्या रांगोळीजवळ आणि तुळशीजवळ त्या ठेवल्या जातात. पूर्वी दारासमोर टांगलेल्या आकाशकंदिलातही मातीची पणती लावत. कालानुरूप यामध्ये बदल होत गेला आणि मातीच्या पणतींची जागा हळूहळू विद्युत दिव्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. पणतीसारखे दिसणारे लुकलुकणारे दिवे बाजारात मिळू लागले आहेत. मातीच्या दिव्याची सर या निर्जीव दिव्यांना कशी येणार? त्यामुळे या लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या मोहात न पडता दिवाळी सणामागील शास्त्र लक्षात घेऊन मातीच्या पणत्याच खरेदी कराव्यात. जेणेकरून त्या विकणाऱ्या आणि बनवणाऱ्या गरिबांच्या घरातही दिवाळी साजरी होईल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२३ ऑक्टोबर
१) श्री. विश्वनाथ दामोदर वर्तक
अलिबाग, २३-१०-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**अमृतबेन प्रेमजी जैन, वाढदिवस अलिबाग**

# तीनवेळा निवडून येऊनही प्रश्न कायमच

## जनतेच्या मनात नाराजीचा सूर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारतीय जनता पक्षाने तीनवेळा विधानसभेची उमेदवारी देऊन सुद्धा पनवेलकरांसमोरील पाणी टंचाईचा प्रश्नासह इतर मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम असल्याने प्रशांत ठाकूर यांना यावेळच्या निवडणुकीत मतदारांच्या रोषाचा सामना करावा लागणार आहे. याचा लाभ ठाकूर यांच्या विरोधी गटाच्या प्रतिस्पर्धी उमेदवार नकारार्थी प्रचारातून करता येईल, मात्र पनवेलकरांचे पाणी, आरोग्य व शिक्षणासह मालमत्ता कर, रस्त्यातील खड्डे आणि खंडीत विजेसारखे मूलभूत गरजेच्या समस्या कधी सुटणार हा प्रश्न पनवेलच्या मतदारांकडून विचारला जात आहे.

सोमवारी सकाळी नवीन पनवेल वसाहतीमधील सेक्टर ८ येथील पुर्णिमा दीप या सोसायटीमध्ये राहणारे बबन विश्वकर्मा यांनी घरात पाणी नसल्याने घरासमोरील रस्त्यांच्या खड्ड्यांमध्ये साचलेल्या खड्ड्यातील पाण्यात जाऊन आंघोळ केली आणि त्याची ध्वनीचित्रफीत समाजमाध्यमांवर पसरवली. विश्वकर्मा हे शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी आहेत. अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी बोअरवेल सुद्धा खणल्या आहेत. अजून किती वर्षात हा पाणी प्रश्न सुटेल, याचे ठाम उत्तर अद्याप पनवेल महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको मंडळ या प्रशासनाचे प्रशासक पनवेलकरांना देऊ शकले नाहीत. पिण्याचे पाणीच अपुरे असल्याने इतर पायाभूत सुविधांची सुद्धा बोंब पनवेलमध्ये आहे. पनवेल महापालिका डांबरी रस्त्यांमधील खड्याची समस्या कायमची सोडविण्यासाठी कॉंक्रिटचे रस्ते बांधत आहे. मात्र एकाच वेळेस हे शहरातील सर्व रस्ते कॉंक्रिटचे करता येणार नसल्याने पुढील पाच वर्षे तरी पनवेलकरांना रस्त्यातील खड्ड्यांचा सामना करावा लागणार आहे. एकही शाळा महापालिकेने सिडको वसाहतींमध्ये मागील आठ वर्षात बांधू शकली नाही.

राज्यात भाजपची सत्ता असताना सुद्धा राज्याचे शिक्षण खाते व ग्रामविकास विभागात असमन्वयामुळे पनवेल क्षेत्रातील शिक्षण विभागाचे हस्तांतरण रखडले. पालिकेची शिक्षणाची गंगा फक्त पनवेल शहर पुरतीच मर्यादित राहिली. सिडको वसाहती आणि ग्रामीण पनवेलमध्ये पालिकेची एकही शाळा नाही. मालमत्ता कराच्या वसूलीसाठी आग्रही असलेल्या पालिकेने निवडणूक काळात प्रशांत ठाकूर यांना मतदारांच्या रोषाचा सामना होऊ नये यासाठी करवसूलीला ब्रेक लावला आहे. परंतु हाच मालमत्ता कर यावेळच्या निवडणुकीत ठाकूरांच्या विरोधी प्रचाराचा मुख्य मुद्दा बनणार आहे. मालमत्ता कराच्या देयकामध्ये पालिका प्रशासनाने पाणी व शिक्षण कराची मागणी करधारकांकडून केली आहे. तशी वसूली सुद्धा सुरु आहे. परंतु या दोन्ही सुविधा पालिका देऊ शकली नाही. मागील आठ वर्षात पनवेलकरांच्या आरोग्यासाठी स्वताचे एक रुग्णालय पालिका बांधू शकले नाही. रस्त्यातील खड्डयामुळे वेळोवेळी अपघात होत आहे. शाळांजवळील रस्ते अजूनही खड्ड्यात हरवलेत. कॉंक्रिटचे रस्ते करण्याला पालिका प्राधान्य देत असले तरी डांबरी रस्त्यांवरील खड्डे मुक्त पनवेलची पनवेलकर प्रतिक्षेत आहेत. अशीच स्थिती ग्रामीण पनवेलच्या दिड लाख लोकवस्तीमधील मतदारांची आहे.

# ‘कोमसाप’च्या शाखाध्यक्षपदी माधव कदम

## कार्यवाहपदी सिद्धेश खटावकर

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कणकवली शाखेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार, लेखक माधव कदम यांची तर कार्यवाहपदी सिद्धेश खटावकर यांची निवड करण्यात आली.

‘कोमसाप’चे जिल्हाध्यक्ष मंगेश मसके यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा समन्वयक रूजारिओ पिंटो, सुरेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील हॉटेल अप्पर डेकच्या सभागृहात आयोजित बैठकीत नूतन कार्यकारी मंडळाची सर्वानुमते निवड केली.कणकवली मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक, ज्येष्ठ साहित्यिक, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या सूचनेनुसार येथील साहित्यिक, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची बैठक झाली.

कोमसापचे जिल्हाध्यक्ष मंगेश मसके अध्यक्षस्थानी होते. यावेळी मसके यांनी सर्वानुमते कणकवली शाखेच्या नूतन कार्यकारी मंडळाची निवड केली. यात तालुका शाखाध्यक्ष माधव कदम, जिल्हा प्रतिनिधी आर्किटेक्ट, उद्योजक संदीप वालावलकर, उपाध्यक्ष राजस रेगे, खजिनदार डॉ. सतीश कामत, कार्यवाह सिद्धेश खटावकर, कार्यकारी मंडळ सदस्य गणेश जेठे, महेश काणेकर, डॉ. मिलिंद कुलकर्णी, अशोक करंबेळकर, निकिता ठाकूर, चिराग बांदेकर, अमर पवार, रिमा भोसले, अभय खडपकर, धाकू तानावडे, नीलेश ठाकूर, लक्ष्मण नारकर, गीतांजली कुलकर्णी यांची निवड झाली.

# टास्क फोर्स आणणार अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**

दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यांतील १२ गावांमध्ये वृक्षतोडीस बंदी घातली आहे. त्यानुसार अवैध होणाऱ्या वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवण्याकामी सावंतवाडी-दोडामार्ग टास्क फोर्स तयार करण्यात आली आहे.

उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील जनहित याचिकेमध्ये ५ डिसेंबर २०१८ व २२ मार्चच्या आदेशान्वये या समितीत महसूल, वन, पोलीस विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीचे अध्यक्ष हे उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी असून, सदस्य सचिव सहाय्यक वनसंरक्षक वैभव बोराटे आहेत. समितीत उपविभागीय पोलिस अधिकारी विनोद कांबळे, सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील, दोडामार्ग वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली मंडल सावंतवाडी वनपरिक्षेत्र अधिकारी नेहा वानरे, आंबोली वनपरिक्षेत्र अधिकारी अमित कटके, सावंतवाडी पोलीस निरीक्षक अमोल चव्हाण, दोडामार्ग पोलीस निरीक्षक हे सदस्य आहेत.

या समितीत वृक्षतोडीस प्रतिबंधित क्षेत्रात संबंधित विभागांनी वृक्षतोडीस प्रतिबंधाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही, प्रचार-प्रसिद्धी व प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा दरमहा आढावा घेतला जाणार आहे.

खासगी मालकी वा शासकीय क्षेत्रात वृक्षतोड निदर्शनास आल्यास जनतेने तातडीने कळवावे. वनविभागाकडील अधिकारी वा कर्मचारी घटनास्थळी जाऊन तत्काळ चौकशी करून आवश्यक कार्यवाही करतील. समितीच्या ई-मेलवर ऑनलाईन तक्रार दाखल करता येते.

## रासाई युवा मंडळातर्फे अन्नधान्याची मदत

**सावंतवाडी :** आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या तेंडुलकर कुटुंबीयांना श्री रासाई युवा कला क्रीडा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन नवरात्रोत्सवाला जमा झालेल्या अन्नधान्यातून नारळ, तेल, तांदूळ, डाळ, तेल या वस्तूंच्या स्वरुपात मदत केली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष कृष्णा लाखे, उपाध्यक्ष विकी लाखे, सचिव नीतेश पाटील, कार्याध्यक्ष रोहित लाखे, युवा मंडळाचे अध्यक्ष पवन पाटील, गणेश खोरागडे, साई लाखे आदी उपस्थित होते. तेंडुलकर कुटुंबांची भेट लक्ष्मण कदम यांच्या माध्यमातून मंडळाला घडवून आणली.

# मातोंडमध्ये शिबिरात १०३ जणांची चिकित्सा

**। वेंगुर्ले । वृत्तसंस्था ।**

मातोंड-नाटेलीवाडी येथे तेथील देव खरोबा मित्रमंडळ आयोजित उपमुख्यमंत्री वैद्यकीय कक्षामार्फत आणि एसएसपीएम मेडिकल कॉलेज लाईफ टाईम हॉस्पिटल, पडवे यांच्या माध्यमातून महाआरोग्य शिबीर झाले. या शिबिराचा १०३ रुग्णांनी लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन मातोंड सरपंच मयुरी वडाचेपाटकर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने झाले. उपसरपंच आनंद परब, माजी उपसभापती प्रफुल्लचंद्र परब, ग्रामपंचायत सदस्य दीपेश परब, विशाल बागायतकर, वैभवी परब, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम परब आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरासाठी लाईफ टाईम हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश घोगळे, डॉ. योगेश केंद्रे, डॉ. अभिजीत खाके, डॉ. नीलेश मेत्रे, गोविंद परब यांचे सहकार्य लाभले. शिबिरात नेत्र तपासणी, हृदय, रक्त, ब्लड प्रेशर, शुगर तसेच इतर तपासण्या करण्यात आल्या. शिबिरासाठी मंडळाचे कार्यकर्ते सत्यवान वैद्य, मंगेश जबडे, प्रसाद जबडे, जयराम केणी, आनंद जबडे, गुरुनाथ नाईक, परशुराम नाईक, नंदकिशोर जबडे, विजय कोरगावकर, सुनील जबडे आदींनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन प्रसाद नाईक यांनी केले.

## सहायक पोलीस निरीक्षकपदी कातिवले

**सावंतवाडी :** सावंतवाडी पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी संजय कातिवले यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी यापूर्वी जिल्ह्यातील कुडाळ व देवगड पोलीस ठाण्यात काम केले होते. कुडाळ पोलीस ठाण्यात २०१३ ते २०२१ या कालावधीत उपनिरीक्षक म्हणून काम केले.

त्यानंतर त्यांना सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी बढती मिळाली. त्यांनी देवगड पोलीस ठाण्यात २०१९ ते २०२१ या कालावधीत सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून काम केले. त्यानंतर त्यांची बदली पालघर येथे झाली. तेथे त्यांनी पालघर रेल्वे पोलिसांत सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी काम पाहिले.

## तेंडोली हायस्कूलला विविध साहित्य भेट

**कुडाळ :** शिमडझू ॲनालिटिकल इंडिया प्रा. लि. (मुंबई) आणि स्पार्क फाउंडेशन (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने तेंडोली येथील परशुराम नाईक मास्तर हायस्कूलला साहित्य भेट देण्यात आले. प्रशालेच्या शैक्षणिक गरजा ओळखून प्रोजेक्टर, टीव्ही सेट, संगणक, साऊंड सिस्टिम, हार्मोनियम, तबला, ढोलकी आदी वस्तू भेट देण्यात आल्या. शिमडझू ॲनालिटिकल इंडिया प्रा. लि.च्या सोनल रगजी, अभिजीत रगजी, स्पार्क फाउंडेशनचे स्वप्नील कारभारी, शैलेश कासार, सरपंच अनघा तेंडोलकर, पोलिसपाटील संजय नाईक, मुख्याध्यापक एस. पी. समुद्रे, मानसी तेंडुलकर, सूर्यकांत पाटकर, प्रदीप राऊळ, राजन राऊळ, वेदिका प्रभू, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. जिल्ह्याच्या शालेय क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल प्रशालेचे विद्यार्थी यश तेंडोलकर, राज लाड, आर्यन पेंडुरकर, विकास चिंदरकर व आर्यन थोरबोले यांचा अभिजीत रगजी व प्रदीप प्रभू यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक ए. डी. काळे, सूत्रसंचालन लतिका पाटकर, तर आभार समुद्रे यांनी मानले.

# ‘एनसीसी’तर्फे कोकण रत्न सागरी मोहीम

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

२-महाराष्ट्र एनसीसी नेव्हल युनिटतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे कोकण रत्न सागरी नौकाभ्रमण मोहीम पुढील महिन्यात मिऱ्या ते बोऱ्या बंदर व तिथून परत मिऱ्यापर्यंत अशी आखली आहे. आमचा समुद्र आमचा अभिमान या अंतर्गत गावागावांत पथनाट्यातून संदेश दिला जाणार आहे. समुद्राबाबत जनजागृती केली जाणार आहे.या मोहिमेसंदर्भात कमांडिंग ऑफिसर के. राजेशकुमार, अधिकारी अंकित रवी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

**असे असेल वेळापत्रक**

**नोव्हेंबर मोहिमचे उद्घाटन**

**रत्नागिरी ते मिऱ्या, ता. ६ मिऱ्या ते साखरतर (काळबादेवी व परत), ता. ७ मिऱ्या ते तिवरी, ता. ८ तिवरी ते वरवडे व परत, ता. ९ तिवरी ते जयगड, ता. १० जयगड ते तवसाळ व परत, ता. ११ जयगड ते बोऱ्या व परत, ता. १२ जयगड ते तिवरी, ता. १३ तिवरी ते मिऱ्या आणि ता. १४- मिऱ्या ते रत्नागिरी.**

भगवती बंदरातून या मोहिमेचा प्रारंभ होणार आहे. शिडाच्या दोन बोटी वल्हवत सागरी मोहीम दरवर्षी आयोजित केली जाते. अखिल भारतीय सागरी नौका भ्रमण मोहीम २०२५ च्या २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन शिबिरातील ही स्पर्धा असते. यांत्रिकी साधन नसताना शिडाच्या माध्यमातून भरती, ओहोटी वाऱ्याचा वेग, पाण्याचा विद्युत प्रवाह या साऱ्यांचा अभ्यास करून दोन्ही बोटी पाण्यावरील धाडस छात्रसैनिक करणार आहेत. सध्या रत्नागिरीत पूर्व सागरी नौकाभ्रमण मोहिमेचे शिबीर सुरू आहे.

यात पुणे, मुंबई अ, ब, नागपूर, औरंगाबाद, अमरावती व कोल्हापूर एनसीसी हेडक्वार्टरमधून एनसीसी कॅडेट सहभागी झाले आहेत. यातून ६० कॅडेट्सची निवड करण्यात येणार आहे. या कालावधीत भगवती मंदिर, काळबादेवी, गणपतीपुळे मंदिर, कवी केशवसुत स्मारक, रत्नागिरीतील दीपगृह आदी ठिकाणांना भेट दिली जाणार आहे. पथनाट्याच्या माध्यमातून समुद्राची काळजी कशी घ्यावी यासंदर्भाने जनजागृती करण्यात येणार आहे.

# चायनीज सेंटरवर अमली पदार्थांची विक्री

## पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळवली येथील चायनिज दुकानात काम करतानाच अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला अमली पदार्थ विरोधी पथकाने सोमवारी रात्री गस्ती दरम्यान अटक केली आहे.

मयुर तानाजी सुपुगडे (३०) असे या व्यक्तीचे नाव असून अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच्या ताब्यातून अडीच लाख रुपये किंमतीचा १० ग्रॅम वजनाच्या हेरॉईन या अमली पदार्थाच्या ६७ पुड्या जप्त केल्या आहेत.

अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडू व त्यांचे पथक सोमवारी गस्त करण्यासाठी बाहेर पडले होते.

रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास अमली पदार्थ विरोधी पथक नोसील नाका येथून तळवली गावाकडे जात असताना, तळवली गाव येथील जय भवानी चायनिज सेंटरमध्ये एक व्यक्ती तेथे येणाऱ्या लोकांना छोटी पुडी देऊन त्यांच्याकडुन पैसे घेत असल्याचे निदर्शनास आले. सदर व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करत असल्याचा संशय आल्याने अमली पदार्थ विरोधी पथकाने तत्काळ सदर ठिकाणी छापा मारुन संशयास्पद पुड्या विकणाऱ्या मयुर सुपुगडे याला ताब्यात घेतले.

यावेळी अमली पदार्थ विरोधी पथकाने त्याची झडती घेतली असता, त्याच्या खिशाम ध्ये सुमारे अडीच लाख रुपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाच्या हेरॉईनच्या ६७ पुड्या आढळून आल्या. यावेळी मयुर सुपुगडे याच्याकडे अमली पदार्थबाबत चौकशी केली असता, तो चायनिज दुकानामध्ये कामाला असल्याचे व त्याचा मालक विक्रमसिंग चरण याने त्याला हेरॉईन हे अमली पदार्थ विक्रीकरीता त्याला दिल्याचे सांगितले.

# श्री क्षेत्र पैठण येथे अखंड हरिनाम उत्सव

**। रसायनी । वार्ताहर ।**



खानावले येथील माजी प्रभारी सरपंच मोहन बाळाराम लबडे व योगिता मोहन लबडे याच्या वतीने वडिल कै. बाळाराम कोंडाजी लबडे यांच्या स्मरणार्थ श्री क्षेत्र पैठण येथे पाच दिवस अखंड हरिनाम उत्सवात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या उत्सवात रखालापूर पनवेल तालुक्यातील वारकरी सहभागी झाले होते. पाचशेपेक्षा अधिक नागरिक या उत्सवांत हरिनामाच्या जयजयकारात तल्लीन झाल्याचे दिसून आले. यावेळी आनंद महाराज खंडागळे चौक, जगन्नाथबाबा रत्नाकर, दामोदर सिताराम लबडे, काशिनाथ महाराज लबडे, शांताराम सिताराम लबडे यांचे किर्तन झाले. उत्सव यशस्वी करण्यासाठी मोहन बाळाराम लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सद्गुरु माऊली सेवा मंडळ चौक, संत तुकाराम वारकरी मंडळ बारवई परिसर यांनी परिश्रम घेतले. माजी प्रभारी सरपंच मोहन लबडे आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ दरषर्षी श्री क्षेत्र पैठण येथे अखंड हरिनाम उत्सवाचे आयोजन करत असल्याने वारकरी सांप्रदायाकडून कौतुक होत आहे.

# तिसऱ्या महामुंबईच्या निर्मितीला शेतकऱ्यांचा विरोध

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



राज्य सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात करत घिसाडघाईने घेतलेल्या तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीच्या निर्णयाचा कडवट शब्दात विरोध, निषेध करतानाच याप्रकरणी राज्यपालांना निवेदन देऊन आचारसंहिता संपताच मंत्रालयावरच मोर्चा काढण्याचा निर्णय एमएमआरडीए भूसंपादन विरोधी शेतकरी संघर्ष समितीने पाणदिवे येथेआयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात आला.

विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारने तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी उरण, पनवेल, पेण तालुक्यातील १२४ महसूल हद्दीतील गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्यासाठी अध्यादेश काढला आहे.

शेतकऱ्यांशी कोणत्याही प्रकारची चर्चा न करता आणि शेतकऱ्यांना विश्वासात न घेता आणि पंचवीस हजार शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या सूचना हरकतीना केराची टोपली दाखवत बड्या भांडवलदारांच्या विकासाच्या आर्थिक फायद्यासाठी काढण्यात आलेल्या अध्यादेशामुळे शेतकरी संतप्त झाले आहेत.

संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी भूमिकेविरोधात संघर्षाचा पवित्रा घेतला आहे. याबाबत आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी पाणदिवे येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या शासनाचा बद्दल शेतकऱ्यानी संताप व्यक्त केला.

## नवी मुंबई मेट्रो प्रवाशी संख्या २० हजारांवर

# तिकीट दर घटले, प्रवाशी वाढले

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**



सिडकोने मेट्रोच्या तिकीट दरात कपात केल्यामुळे नवी मुंबई मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होऊन दैनंदिन प्रवाशी संख्या २० हजार झाली आहे. शिवाय मेट्रोच्या उत्पन्नातही भर पडत असल्यामुळे सिडकोचा मेट्रो प्रकल्प विभाग सम ाधान व्यक्त करीत आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून मागील वर्षी १७ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झालेल्या नवी मुंबई मेट्रोला ११ महिने पूर्ण झाले आहेत. मेट्रो सेवा सुरू होताच तळोजा आणि खारघर उपनगरातील प्रवाशांकडून सुरुवातीला चांगला प्रतिसाद मिळाला. दरम्यान, सुट्टीच्या दिवशी मेट्रोने प्रवास करणाऱ्यांची संख्या दहा ते बारा हजारांवर गेली होती. तसेच पावसाळ्यात मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या पंधरा हजारांपर्यंत वाढ झाली झाल्याने महिनाकाठी एक कोटी रुपयांहून अधिक उत्पनात वाढ झाली होती. पावसाळ्यानंतर प्रवासी संख्या कमी होण्याची शक्यता असल्यामुळे सिडकोने ७ सप्टेंबर २०२४ पासून तिकीटाचा किमान दर १० व कम ाल रुपये ३० करून नवी मुंबईतून प्रवास करणाऱ्या मेट्रो प्रवाशांना मोठा दिलासा दिला. त्यामुळे प्रवासी संख्येत वाढ झाली असून दैनंदिन प्रवासी संख्या २० हजारांच्या घरात गेली आहे. तसेच मासिक उत्पनात वाढ झाल्याचे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> **नवी मुंबई परिसरातील नागरिक मेट्रो सेवेचा वापर करत आहेत, याचा आम्हाला आनंद आहे. सर्वसामान्यांना चांगली जीवनशैली देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.**
>
> **- प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको.**

# पर्यावरणपूरक बांबूच्या आकाश कंदिलांना पसंती

**। महाड । वार्ताहर ।**



दिवाळी आली की घराची साफसफाई, सजावटीला सुरुवात होते. दीपोत्सवाला काही दिवस शिल्लक असून बाजारात वेगवेगळ्या प्रकाराचे आकाश कंदील विक्रीसाठी दाखल झाले आहेत. बांबूंच्या काड्यांपासून बनविलेल्या पर्यावरणपूरक आकाश कंदिलाला सध्या ग्राहकांची पसंती मिळत आहे. महाडमधील ७८ वर्षीय आजोबा व त्यांचा पुतण्या पारंपरिक आकाश कंदील बनवण्याची कला आजही जोपासत आहेत. प्लास्टिक आणि चिनी बनावटीच्या आकाश कंदिलांच्या कोलाहलात त्यांनी पारंपरिक वाटचाल सुरू ठेवली आहे.

दिवाळी म्हटली की फराळ, फटाके आणि आकाश कंदील यांचा आवर्जून उल्लेख केला जातो. घराबाहेर दरवाजावर, गच्ची व गॅलरीमध्ये रस्त्यांवर उंच ठिकाणी आकाश कंदील लावले जातात. रंगीबेरंगी, चौकोनी, गोल, षटकोनी अशा आकाराचे आकाश कंदिलांचा झगमगाट वातावरणात उत्साह, नवतेज निर्माण करतो. बदलत्या काळानुसार बाजारामध्ये प्लॅस्टिकचे आकाश कंदील तर चिनी बनावटीचे आकाश कंदील मोठ्या प्रमाणात दाखल झाले असले तरी महाडमधील काका- पुतण्या बांबूच्या काड्यांचे आकाश कंदील तयार करून विकत आहेत.महाड बाजारपेठेमध्ये कदम बंधू या दुकानाच्या शेजारी वसंत फुटाणकर हे ७८ वर्षीय वृद्ध व त्यांचा पुतण्यासह बांबूच्या काड्यांचे आकाश कंदील बनवत आहेत. वसंत फुटाणकर ५० वर्षांपासून ही कला जोपासत आहेत. तर, त्यांचा तरुण पुतण्या आपल्या काकांकडून आलेली ही कला सद्यस्थितीत पुढे चालवताना दिसतो. घराबाहेर असलेल्या छोट्याशा दुकानात त्यांनी बांबूचे कंदील विक्रीला ठेवले आहेत. आपली कला जोपासत असताना त्यातून चार पैसे कमवण्याची धडपड या कुटुंबियांची दिसते आहे.कंदिलासाठी लागणाऱ्या बांबूच्या बारीक काड्या गुळगुळीत करून वेगवेगळ्या आकाराच्या ३२ काड्या तयार करून त्या दोऱ्याने बांधून सांगाडा तयार केला जातो. या बांबूच्या सांगाड्यावर डिंकाच्या साह्याने पतंगाकृती कागद चिटकवून आकाश कंदील सजवला जातो. बांबूचे आकाश कंदील बनवण्यासाठी मेहनत तर लागतेच; परंतु अचूकता व सुबकताही लागते. तयार झालेला अतिशय सुंदर असा हा पारंपरिक आकाश कंदील दिव्यांच्या रोषणाईमध्ये अधिकच सुंदर दिसतो. कंदिलासोबतच वेगवेगळ्या प्रकारच्या चांदण्याही फुटाणकर बनवतात. मोठ्या कंदिलाची किंमत साडेचारशे रुपये इतकी आहे. याशिवाय मंदिरे, सोसायटी तसेच रस्त्यावर लावण्यात येणारे भव्य कंदीलदेखील ऑर्डरनुसार बनवून देत असून त्यांची किंमत दीड हजाराच्या पुढे आहे. फुटाणकरांच्या कंदिलांना सुरत, अहमदाबाद, मुंबई, पुण्यातील ग्राहकांकडूनही मागणी आहे. एका महिलेला हा कंदील इतका आवडला की तिला तो परदेशातही न्यायचा होता; परंतु कंदील फोल्ड होऊ शकत नसल्याने नेता आला नाही.

# मुंबई-गोवा महामार्गावरील अपघाताचा धोका वाढला

**। कोलाड । वार्ताहर ।**
**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर, रातवड, विठ्ठलवाडी, तळवली, कोलाड, पुई, पुगांव, खांब, सुकेळी, वाकण अशा विविध ठिकाणी दिशादर्शक फलकाजवळच मोठंमोठे खड्डे पडलेले आहेत. या खड्डयांमुळे वाहनचालकांसह प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे संबंधित ठेकेदारांनी दिशादर्शक फलकाजवळील खड्डे भरावेत, अशी मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.**



मुंबई-गोवा महामार्गावरील एका बाजुकडून दुसऱ्या बाजूकडे जाण्यासाठी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. परंतु, ज्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत त्या ठिकाणच्या रस्त्याची परिस्थिती अतिशय बिकट बनली असुन या रस्त्यावर मोठंमोठे खड्डे पडलेले आहेत. यामुळे वाहने पलटी होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी पुगांव येथील दिशादर्शक फलकाजवळून एक इको गाडी जात असतांना येथील खड्ड्यांमध्ये वाहन चालकाने ब्रेक लावला असता गाडी पलटी झाली. सुदैवाने यात कोणतीही जिवीत हानी झाली नाही. परंतु, ज्या ठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत त्याच ठिकाणच्या रस्त्याची बिकट परिस्थिती आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली १७ वर्षांपासून सुरु असुन हा मार्ग पूर्ण होण्यासाठी लोकनेत्यांकडून फक्त तारीख पे तारीख देण्यात आल्या आहेत. परंतु, या महामार्गाचे काम पूर्ण झाले नाही. आता या महामार्गाची डिसेंबरची डेडलाईन देण्यात आली असुन गणपती नंतर ठिकठिकाणी या मार्गाचे काम वेगाने सुरु आहे. परंतु, असे असले तरी संबंधित ठेकेदारदारांनी एका बाजुकडून दुसऱ्या बाजूकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम चांगल्या प्रकारे केले पाहिजे होते. परंतु, कोणत्याही दिशादर्शक फलकाजवळून जाणाऱ्या रस्त्याचे काम हे निस्कृष्ठ दर्जाचे आहे. यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार संबंधित ठेकेदार कारणीभूत असेल, असे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

## दिशादर्शक फलकाजवळच खड्ड्यांचे साम्राज्य

> **पाच ते सहा दिवसांवर दिवाळी आली असुन शाळेतील विद्यार्थ्यांना सुट्ट्या पडत असल्यामुळे लाखो चाकरमानी गावाला येत आहेत. तसेच, पर्यटक देखील सुट्टयांचा आनंद लुटण्यासाठी कोकणात येत असतात. यातच या मार्गावर मोठ्या वाहनांची वर्दळ देखील सुरु असते. यामुळे दिवाळीपूर्वी सर्व दिशादर्शक फलकांजवळून जाणाऱ्या रस्त्याचे खड्डे भरून रस्ता चांगल्या प्रकारे बनविण्यात यावा. – अलंकार खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते**

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आकर्षक पणत्या

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**
शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून पडसरे येथील आश्रम शाळेच्यावतीने इयत्ता आठवी आणि नवविच्या विद्यार्थ्यांनी सुशोभित पणत्या याचबरोबर गांडूळ खत, जीवामृत, दशपर्णी अर्क तयार करून दिवाळी स्टॉलच्या माध्यमातून विक्रीसाठी मांडण्यात आले होते.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी या सुशोभित पणत्या तयार करण्यासाठी साध्या पणत्या विक्री करून त्यांना रंगकाम करून आकर्षक पणत्या बनविल्या. यातील एक पणती जोड २५ रु. विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. यावेळी चिमुकल्यांनी तयार केलेल्या पणत्या खरेदीसाठी ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या दिवाळी स्टॉलच्या माध्यमातून १५० पणत्या जोडची विक्री झाली असे नीलम गुरव यांनी सांगितले. यावेळी शंतनू लिमये, आयबीटी निर्देशक नीलम गुरव, निलेश फाटे व विद्यार्थी उपस्थित होते.

> **आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी रंगकाम करून तयार केलेल्या पणत्या खूप आकर्षक आणि देखण्या आहेत. त्यांच्या या कलेचे कौतुक करू तेवढे कमीच आहे.**
> **– सुलतान बेनसेकर, नगरसेवक, पाली**





# ऑक्टोबर हिटचा पर्यटनावर परिणाम

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**
मुरूड तालुक्यातील तापमान मंगळवारी (दि.२२) ३३ सेल्सियसवर पोचले होते. या ऑक्टोबर हिटमुळे मुरुडकर बेहाल झाले होते. दुपारच्या वेळेत उन्हाचे चटके बसत असल्याने नागरिक तसेच पर्यटकांनी घराबाहेर न पडण्याला पसंती दिली होती. यामुळे तालुक्यातील रस्ते, बाजारपेठा तसेच समुद्रकिनारा ओस पडला होता. याचा मोठा परिणाम पर्यटनावर झाला आहे.

ऑक्टोबर हिटचा परिणाम केवळ मानवी जीवनावरच नाही तर मुक्या जनावरांवर व समुद्रातील जलचरांना देखील झाला आहे. उथळ समुद्रात आलेली मासळी देखील थंडाव्यासाठी खोल समुद्रात गेल्याची माहिती एकदरा, राजपुरी आदी भागातील मच्छीमारांनी दिली आहे. तसेच, मंगळवारी मुरुडच्या बाजारपेठेत देखील फारशी मासळी दिसून आली नाही. गेल्या आठवड्यात काशीद, मुरूड समुद्रकिनाऱ्यावर पर्यटक आले होते. मात्र, रविवार नंतर पर्यटकांची पांगापांग झाली आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर हिट वाढल्याने पर्यटकांनी घरचा रस्ता पकडल्याने पर्यटन व्यवसाय मंदावला आहे. जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी देखील पर्यटक दिसले नाहीत. गर्मीमुळे देखील पर्यटकांची संख्या रोडावली असल्याचे पर्यटक व्यवसायिकांनी सांगितले.

# मर्कटलीला पर्यटकांचे आकर्षण

**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरानमध्ये विविध वस्तुंच्या आकर्षणासोबतच इथली माकडे देखील पर्यटकांचे आकर्षण ठरत आहेत. माथेरानमध्ये कुठेही गेल्यावर माकडांच्या टोळ्या दिसत असतात. येथील प्रत्येक पॉईंवर ही माकडे आपल्या समुदायाने जंगलात वास्तव्य करून राहतात. तर, माथेरान गावात सुध्दा यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. मुख्य प्रवेशद्वार दस्तुरी पासून ते वन ट्री हिल पॉईंट या शेवटच्या टोकापर्यंत जिकडे तिकडे माकडेच दिसत असतात.

मागील काही वर्षांपासून हॉटेलमधील किचन वेस्ट नगरपरिषदेच्या बायोगॅस प्रकल्पासाठी वापरले जात असल्याने त्यांच्या खाण्याची गैरसोय झाली आहे. यामुळे ही माकडे भररस्त्यात पर्यटकांच्या हातातील खाद्य पदार्थ किंवा शीतपेय बाटली हिसकावून फस्त करतात. शक्यतो ही माकडे कुणाला इजा करत नाहीत. परंतु, त्यांना दगड मारल्यास संतापुन अंगावर गुरगुरतात.



पावसाळ्यात तर गावातील नागरिकांच्या घरामध्ये शिरून जो काही खाद्यपदार्थ हाताला मिळेल ते घेऊन पळ काढतात. माथेरानचे हे एकमेव आकर्षण असून खाण्याची आबाळ झाल्यामुळे केवळ भुकेपोटी पर्यटकांच्या हातातील खाद्यपदार्थ हिसकावून नेत असतात.

# कोमसाप म्हसळा शाखेचे उद्घाटन

**। म्हसळा । वार्ताहर ।**
मधु मंगेश कर्णिक यांनी स्थापन केलेल्या कोकण मराठी साहित्य परिषद या साहित्यिक संस्थेच्या रायगडमधील म्हसळा तालुक्यात सोळाव्या शाखेचा उद्घाटन समारंभ सोमवारी (दि.२१) केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे हे होते. यावेळी कोमसाप रायगडचे अध्यक्ष सुधीर शेठ, एल.बी. पाटील, अ.वि. जंगम, संजय गुंजाळ, सिद्धेश लखमदे, सीमा रिसबूड आणि कार्यकारिणी सदस्य, अपर्णा ओक, भिमराव सूर्यतल, सुनिल उमरोटकर, रमेश जाधव, पांडू पाटिल, रिझवाना सय्यद, रेश्मा सोंडकर, निता ढवळे, उदय करडे, सायली चोगले, प्राची मेंदाडकर आदी मान्यवर उपस्थित होते.



# द्रोणागिरीत 'ओनम' उत्सव संपन्न



**। उरण । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील जेएनपीटी बहुउद्देशीय हॉल येथे ओनम उत्सव कार्यक्रम रविवारी (दि.२०) संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरवात केरळच्या महाबळी राजाच्या स्वागताने करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीश चेनॉन, रघुनाथ राघवन, निशा सुधीर व त्यांच्या सहकार्यानी मेहनत घेतली. कार्यक्रमात दहावी व बारावीत उत्तीर्ण झालेल्या मुलांचा सत्कार करून व बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात थिरुवाथिरा, ओनम नृत्य व इतर केरळचे पारंपरिक नृत्य सादर करण्यात आले होते. तसेच, युथ विंग नृत्य प्रकाराने या कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी लहानांपासून ज्येष्ठ नागरीकांपर्यंत सर्वांनी सहभाग घेतला.





● अलिबाग तालुक्यातील आक्षी-साईनगर येथील साईबाबा मंदिराचा २५वा वर्धापन दिन सोमवारी (दि.२१) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी साई मंदिर विविध फुलांनी सजविण्यात आले होते.

## माणगावात गरजूंना ब्लँकेटचे वाटप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या चॅरिझेन व रेड हाऊस फाउंडेशन यांच्यामार्फत माणगाव शहरातील गरजूंना सोमवारी (दि.२१) सुवर्णा जाधव यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव या माणगाव तालुक्यासह मुंबईत सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून बहुजन समाजात काम करीत आहेत. गरिबांना तसेच बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने त्या काम करीत आहेत. यातून गोरगरीब जनतेला रोजगार उपलब्ध होऊन त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागेल, असे त्यांचे मत आहे. गरीब जनतेसाठी समाजात काम करीत असल्याने त्यांच्या विशेष प्रयत्नांनी चॅरिझेन व रेड हाऊस फाउंडेशन यांच्या सहकार्याने त्यांनी माणगाव शहरातील गोरगरीब अशा ३०० लोकांना ब्लँकेटचे वाटप केले.

# विविध साहित्यांनी बाजारपेठा सजल्या

**। तळा । वार्ताहर ।**
दिपावली सण अवघ्या पाच दिवसांवर येऊन ठेपला असल्याने तळा बाजारपेठ विविध साहित्यांनी सजली आहे. हिंदू धर्मात दिवाळी सणाला अनन्य साधारण महत्व आहे. यामुळे दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यानिमित्ताने बाजारपेठेत विविध प्रकारचे आकाश कंदिल, पणत्या, विविध प्रकारची रांगोळी, रांगोळी काढण्याचे साचे, लहान मुलांच्या बंदुका, विविध प्रकारचे फटाके, सुगंधी उटणे अशा अनेक साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे.



दरवर्षी दिवाळीच्या काही दिवस आधीपासूनच तळा बाजारपेठेत नागरिक दिवाळी साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी करीत असत. यामुळे व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपल्या दुकानात दिवाळीत लागणाऱ्या साहित्यांचा माल भरला आहे. मात्र, नागरिकांची शेतीची कामे अद्यापही पूर्ण झालेली नसल्याने दिवाळीला पाच दिवस बाकी राहिलेले असताना देखील नागरिक खरेदीसाठी घराबाहेर पडलेले नाहीत. यामुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण असून दिवाळीच्या काळात नागरिक फटाक्यांसह दिवाळीचे साहित्य खरेदी करतील अशी आशा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांना आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- नागाव येथे कामासाठी बाई ची आवश्यकता. घरकाम व मुलाला सांभाळणे. पगार- १२,०००/- संपर्क- ७८७५८६६५५५
- फ्लॅट शोधत आहात? नवीन 2BHK प्रशस्त फ्लॅट विकणे आहे. ठिकाण : मोक्याच्या जागी, अलिबाग. अपेक्षित किंमत ८१ लाख, निगोशिएनल संपर्क :- ८२७५११९८८३.
- वरदान फ्युअल स्टेशन येथे कामासाठी मुलगी पाहिजे शिक्षण १५ वी पास व कॉम्प्युटर कोर्स (Tally, Excel) व कमीत कमी एक वर्षाचा एक्सपिरिअन्स हवा भेटायला येण्याची वेळ 10 AM To 4PM संपर्क : ७४४७४०४४११, ७४४७४०४४३८
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी मावशी (आया) हवी आहे. संपर्क : ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ x १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- संपर्क संस्था पोयनाड (अलिबाग) बालग्रामसाठी १) अधीक्षक, २) सोशल वर्कर, ३) समुपदेशक पदे त्वरीत भरणे आहे. संपर्क- ९७६६५४२१७५, इमेल - samparc@gmail.com
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## इको फ्रेंडली, हॅन्डमेड वस्तूंना पसंती

# ऑनलाईन फराळाला वाढती मागणी

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**
**दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. दिवाळीत घरगुती फराळाला अधिक मागणी असते. हा घरगुती फराळ घरपोच मिळाला तर दुधात साखरच! ऑनलाईन तसेच फेसबुक व व्हॉट्सअपद्वारे घरपोच घरगुती दिवाळी फराळ उपलब्ध होत आहे. यामूळे नोकरदार महिलांसह अनेकांची दिवाळी अगदी सुकर होणार आहे. ऑनलाईन फराळ खरेदी व विक्रीच्या ट्रेंड सोबतच इको फ्रेंडली व हॅन्डमेड भेट वस्तूंना पसंती मिळत आहे. यामुळे स्थानिक विक्रेते व महिलांना यातून नवे दालन उभे राहिले आहे.**




धकाधकीच्या जिवनात सण-उत्सवाची तयारी करण्यासाठी अनेकांना वेळ नसतो. यात दिवाळीच्या फराळाची तयारी करणे म्हणजे दिव्यच झाले आहे. कित्येक वेळा चांगल्या दर्जाचा व परवडणाऱ्या किंमतीत फराळ मिळावा यासाठी बाजारात अनेक दुकानाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. परंतु, ऑनलाईन मार्केटिंगने हि समस्या मार्गी लावली आहे. फेसबुकवरील विविध पेजच्या माध्यमातून तसेच व्हॉट्सअपद्वारे घरगुती फराळ विक्री होत आहे. यामुळे एका फोनवर, व्हॉट्सअप मेसेज, एसएमएस किंवा इमेलवर घरपोच उत्तम प्रतीचा फराळ उपलब्ध होणार आहे. या खरेदीतून ग्राहकांना काही आकर्षक ऑफर देखिल मिळत आहेत. यामुळे ऑनलाईन फराळ विक्रि व खरेदी मोठ्या प्रमाणात होणार असून बुकिंगला प्रतिसाद ही चांगला मिळत आहे. इतर वस्तुंबरोबरच आता फराळाने देखिल ऑनलाईन मार्केटवर प्रभाव निर्माण केला असल्याचे दिसत आहे.

> **ऑनलाईन फराळ विक्रिला खुप चांगला प्रतिसाद मिळत आहे. माझ्या सारख्या गृहिणीला सोशल मिडियामुळे जाहिरातीसाठी खर्च करावा लागत नाही. ऑनलाईन फराळ खरेदी करणारा ग्राहक अधिक वेळ न दवडता चटकण ऑर्डर देऊन खरेदी करतो. ग्राहकांनाही चांगल्या प्रतिचा व दर्जाचा माल उपलब्ध करुन देणार आहे. यामुळे ग्राहक देखील समाधानी होतात. रायगड जिल्ह्यासह, ठाणे, मुंबई, पुणे आदी ठिकाणाहून ऑर्डर येत आहेत.**
> **– रेश्मा दुधाणे, संस्थापक, श्री स्वामी समर्थ डिलिशिअस दिवाळी स्नॅक**

### महिलांना स्वयंरोजगाराची संधी

**दिवाळी निमित्त काही संस्थानी ऑनलाईन घरपोच फराळाची सोय केली आहे. विषेश म्हणजे त्यांनी महिला बचत गट, गृहउद्योग सक्षमीकरण व महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलेले आहे. त्यांच्या मार्फत तयार केलेल्या फराळाच्या दर्जेदार वस्तू सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत घरपोच पोहचवल्या जाणार आहेत.**

# सलमान खान निवासस्थान फायरिंग प्रकरण

# मुख्य आरोपीला पोलीस कोठडी



। पनवेल । वार्ताहर ।

बॉलीवूडचा दबंग अभिनेता सलमान खान याच्या हत्येचा कट रचणे तसेच त्याच्या राहत्या घरावर फायरींग करून सलमान खानला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील मुख्य आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी हरियाणातील पानिपत येथून अटक केली होती. सदर आरोपीला आज पनवेल न्यायालयात हजर केले असता त्याला २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, सुखबिर बलबिर सिंग उर्फ सुरण्या शुटर असे या आरोपीचे नाव आहे व तो बिश्नोई गँगचा सदस्य असल्याचे पोलिसांनी सांगितले.

१४ एप्रिल २०२४ रोजी काही संशयित आरोपीनी सिने अभिनेता सलमान खान यांच्या मुबई येथील राहत्या घरावर फायरींग करून सलमान खानला मारण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना घडल्या नंतर मुंबई पोलीस तसेच नवी मुंबई पनवेल पोलिसांनी कारवाई करत दोन संशयितांना अटक केली होती. हे दोन आरोपी काही दिवस पनवेल येथे वास्तव्याला आल्याचे समोर आले होते. या दोघांच्या अटकेनंतर या गोळीबार प्रकरणी पोलिसांनी त्यावेळी पाच आरोपींना अटक केली होती. मात्र, या टोळीचा मुखींया मोस्ट वॉन्टेड आरोपीचा शोध पोलीस घेत होते. सुरण्या शुटर असे त्याचे नाव असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. मात्र, तो पोलिसांना चकवा देण्यात वारंवार यशस्वी होत होता. अखेर त्याच्या मुसक्या आवळण्यात पनवेल शहर पोलिसांच्या पथकाला यश आले आहे. पनवेल शहर पोलिसांच्या पथकांनी हरियाणा येथील पानिपत येथून त्याला अटक केली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना त्याच्याविषयी गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लबडे, पोलीस हवालदार किरण सोनवणे, नितीन वाघमारे यांनी पानिपत येथे जाऊन सुरण्याशुटरलास्थानिकपोलिसांच्या मदतीने अटक केली. सुरण्या शुटर फायरींग प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. इतर सहकाऱ्यांना पैसे, हत्यार पुरवणे त्याच्यावर जबाबदारी होती. सुरण्या शुटर याने स्वतः सलमान खानच्या पनवेल येथील फार्महाऊसची रेखी केली होती. आणि सलमानला रस्त्यातचं गाठून ठार करण्याचा प्रयत्न त्याचा होता, अशी माहिती सुद्धा मिळत आहे. दरम्यान सदर आरोपीची आज पोलीस कोठडी संपल्याने त्याला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि प्रवीण भगत यांनी पनवेल न्यायालयात हजर करून आपली बाजू मांडताना सदर आरोपीकडून इतरही आरोपींची माहिती घेणे बाकी आहे तसेच इंटरनॅशनल आरोपींशी याचे संबंध असून त्या दृष्टीने पुढील तपास करणे आवश्यक असल्याची बाजू मांडल्यावर न्यायालयाने २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग:-

**-:निविदा सूचना :-**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, तर्फे दिपावली सणानिमित्त भेटवस्तू दिपावली शुभेच्छा ग्रिटींग व बॅनर्स खरेदी/छपाई करणेची आहेत.

वर नमुद केल्याप्रमाणे खरेदी/छपाई करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक २९.१०.२०२४ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल.

कोणतेही कारण न देता कोणतीही अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग.
दिनांक : २३.१०.२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खानाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकीहक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ठ**

**मौजे खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकाचे नाव | स.नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| १) सौ. वैभवी सतिश गडकरी, २) सौ. सुनिला सुनिल शृंगारपुरे, ३) सौ. आरती शारंग पालकर, ४) श्री. प्रदिप देवराम नाचणे, ५) कु. सुदिप प्रदिप नाचणे, ६) श्री. निलेश प्रभाकर चिटणीस, ७) सौ. विद्या विजय देशपांडे, ८) सौ. संपदा अल्हाद दुर्वे, ९) प्रमोद अनंत चिटणीस, १०) जयवंत अनंत चिटणीस, | २४/१/अ | २-३४-६० पो.ख.०-०६-१० एकूण २-४०-७० | १३.६९ |
| प्रमोद अनंत चिटणीस, | २४/२ | ०-०१-०० | ०.०६ |
| १) प्रदिप दत्तात्रेय चिटणीस, २) प्रिया प्रकाश देशपांडे ३) संध्या शरद चिटणीस | २४/३ | ०-२०-०० ०-६८-०० एकूण ०-८८-०० पो.ख.०-०२-०० एकूण ०-९०-०० | ५.२५ |

सदर मिळकतींमध्ये जाण्या-येण्याकरीता नागाव-खानाव रस्त्यापासून सुरू होणाऱ्या व स.नं. २५/३, २५/४ २५/५+६ या मिळकतींमधून उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या वहिवाटीच्या निरंतर हक्कासह.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकीहक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्याआहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २३/१०/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत विनायक प्रमोटर्स तर्फे अतुल महादेव भगत, राहणार १९१, महात्मा गांधी रोड, कॅम्प, पुणे ४११ ००१, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी. ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली, ता.अलिबाग. | १६६/१९०/१९६/ १९७/१९८/१६२ | ४-५०-०० एकूण | ४५-०० |

अलिबाग,
दिनांक : २२/१०/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,
ए विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील
मो.नं. ९८२२२७४५९५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, श्रीमती विठाबाई बाळु कातकरी, रा. निंबोडे दांडवाडी, ता. खालापुर, जि. रायगड यांचे नावे मौजे निंबोडे, ता. खालापुर, जि. रायगड, येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

| अ.क्र. | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | २४ | १ अ | १-२९-५ | १-०६ |
| २ | २४ | २ | २-२७-६ | ५-६४ |

३) उपरोक्त मिळकती श्रीमती विठाबाई बाळु कातकरी यांनी आमचे अशिल यांचे कडून मोबदला रक्कम स्विकारुन मा. दुय्यम निबंधक खालापुर यांचे कडे दिनांक २४/०२/२०१४ रोजी व क्र. ८१२/२०१४ अन्वये नोंदविलेल्या साठेकराराने व मा. दुय्यम निबंधक खालापुर यांचे कडे दिनांक २४/०२/२०१४ रोजी व क्र.८१३/२०१४ अन्वये नोंदविलेल्या अखत्यारपत्राने आमचे अशिल यांस कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले किंबहुना मान्य व कबुल केलेले होते व आहे.

४) नियोजित व्यवहारानुसार उपरोक्त मिळकतीचे विक्री कामी महाराष्ट्र जमिन महसूल संहिता कलम ३६, ३६/अ/२ अन्वये विक्री परवानगी आणणे आवश्यक होते. आणि तशी विक्री परवानगी आणुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी श्रीमती विठाबाई बाळु कातकरी यांनी स्विकारलेली होती व आहे.

५) सबब या जाहीर नोटीस द्वारे असे सुचीत करण्यात येत आहे की, उपरोक्त मिळकती संदर्भात श्रीमती विठाबाई बाळु कातकरी यांचे समवेत कोणीही कसलाही व्यवहार करु नये, तसे केल्यास सदरील व्यवहार आमचे अशिल यांचे वर बंधनकारक रहाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. 'मातोश्री निवास' आवळस,
ता.कर्जत, जि. रायगड
भ्रमणध्वनी क्रमांक ९८८१५७९५५५

## जाहीर समन्स

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयांत**

पु.ता ७/११/२०२४
नियमित दिवाणी मुकदमा नं. १८/२०२४
निशाणी क्रमांक १३/ड
ने. ता. ०८/०१/२०२०

प्रति,
सौ. मानसी राकेश चव्हाण — वादी
विरुद्ध
श्रीमती सुमन संतोष कुरूळकर — प्रतिवादी

प्र.वादी श्रीमती सुमन संतोष कुरूळकर, रा. थळ आगार, गणेश गल्ली, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट १९६३ चे कलम ३४ व ३८ प्रमाणे दिनांक २७/०९/२०२३ रोजी मौजे भाल, ता. अलिबाग येथील गट क्रमांक ७०/३, ७०/४, ७५/१ व ७५/३ बाबत झालेल्या साठेकराराची पुर्तता करणेकरिता व निरंतर ताकीदीकरिताचा दावा दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीनी**

| अ. क्र. | मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे भाल, ता. अलिबाग, जि.रायगड | ७०/३ | ०.४९.०० पो.ख. ०.०३.०० ०.५२.०० | ०.९२ |
| २ | मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड | ७०/४ | ०.३६.०० पो.ख. ०.०३.०० ०.३९.०० | ०.६९ |
| ३ | मौजे भाल, ता. अलिबाग, जि. रायगड | ७५/१ | ०.११.९० पो.ख.०.००.२० ०.१२.९० | १.६२ |
| ४. | मौजे भाल, ता अलिबाग, जि.रायगड | ७५/३ | ०.७८.२० पो.ख. ०.०८.८० ०.८७.०० | १५.१३ |

त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी किंवा दिनांक ७/११/२०२४ रोजी सकाळी १०-३० वाजता तुम्ही स्वतः ज्यास योग्यरीत्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर येऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काऊंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काऊंटर क्लेम) पुष्ट्यर्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बचावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक ०३/०९/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर,**
**अलिबाग-रायगड**

**सदरहु जाहीर समन्सची मुदती दि. ७/११/२०२४ पर्यंत वाढविण्यात आली.**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार श्री. भगवान बाळकृष्ण चंचे यांनी मौजे. बोरगांव ता, कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे मालक श्री. अनंत जनू कार्ले यांची सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| २५ | ३ | ०-२७-८० | ०-६९ |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/१०/२०२४

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता - शॉप नं. ९, समर्थ
कृपा हौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गाण तर्फ परहुर, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. समीर अनिल नेरूरकर यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याने ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| गाण तर्फे परहुर, | १४/१/क | १-७६-०० पो.ख. ०-३७-०० २-१३-०० | ३.१७ |

पैकी समीर अनिल नेरुरकर यांच्या मालकांच्या १ हेक्टर ३० आर, आकार रु. १.९८ या मिळकतीपैकी ० हेक्टर २५ आर एवढी मिळकत.

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षिस, लिज लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २३/१०/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज २४/२०२४

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. सोनाली मारुती पाटील
रा. मु. वाघ्रण, पो. नारंगी — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत वाघ्रण — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे वाघ्रण, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्री. सोनाली मारुती पाटील यांचा जन्म दि. २७/०६/१९९२ रोजी मौजे वाघ्रण, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वाघ्रण येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्राम पंचायत वाघ्रण यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे सागांव ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३, क्षेत्र ०-६५-२० हे. आर., पो. ख. ०-०३-८० हे.आर., एकुण क्षेत्र ०-६९-०० हे. आर. आकार १३.४४ रू. पैसे, पैकी क्षेत्र ०-१७-५० हे. आर. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक अपेक्षा अशोक पाटील व भुमीका प्रणय पाटील यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २२/१०/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व नोटीसीने संबंधितांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक रमेश भवन चौधरी, रा. रुम नं. २१/२२/२३, चौथा मजला, रतनसी मुळजी बिल्डींग, मंगेश शेणॉय स्ट्रिट, जीपीओ जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान जमीन मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| वरसोली ता.अलिबाग, जि. रायगड | ५५/१/१ | २-४६-०० | २४-६० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २३.१०.२०२४

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं. २, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर अलिबाग,
जि. रायगड मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वडवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकतींचे टायटलबाबत खातरजमा करण्याचे काम आमचे अशिलांनी आमचेकडे दिलेले आहे, त्या मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | मालकाचे नाव |
|---|---|---|
| ४३/५ | ०-३०-०० | केतन जसवंत कनकिया |
| ४३/४ | ०-३०-०० | केतन जसवंत कनकिया |
| ४४ | १-४८-५० पैकी ०-४९-२५ | केतन जसवंत कनकिया |

तथापि सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तकार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. असे समजुन, गृहीत धरून टायटल रिपोर्ट दिला जाईल. या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/१०/२०२४

सही /
**ॲड. राकेश पुंडलिक लाडे**
ऑफीस : श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग, जि. रायगड
फोन नं. : ७७९८५९९९६०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या सांगण्यावरून १) राहील इस्माईल सोंडे, २) रश्मीन सलमान दिवाण, ३) नुद्दीन सुफीवान दिवाण, ४) अमरीन इस्माईल सोंडे सर्व रा. मु. नांदगांव, ता. मुरूड, जि. रायगड यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असलेली मौजे - नांदगांव, ता. मुरूड, जि. रायगड शेतजमिन मिळकतींबाबत शोध/तपास करीत आहोत. सदरची मिळकतीचे विद्यमान मालक १) राहील इस्माईल सोंडे, २) रश्मीन सलमान दिवाण, ३) नुद्दीन सुफीवान दिवाण, ४) अमरीन इस्माईल सोंडे यांच्याबरोबर आमचे अशिलांची खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याबाबतची बोलणी चालु आहे.

मौजे नांदगांव, ता. मुरूड, जि. रायगड येथील दुय्यम निबंधक, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नांदगांव, ता.मुरूड, जि.रायगड | ८४६ | २.९०.०० | २९.०० |

जर कोणालाही/कोणाचाही सदरील मिळकतीचे संदर्भात विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, असाईन मेंट, देणगी, हवाला, वारसा, लायसन्स, देखभाल, बीकवेस्ट, इजमेंट, कॉव्हेनंट, गहाण, दान, बक्षिस, लीन, लिस करार, भाडेपट्टा, ताबा, वहिवाट, जप्ती, लिस पेंडन्स, एफ.एस. आय वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, मागणी, हितसंबंध, वा दावा, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी कळवावे.

वरील मुदतीत कोणाकडुन काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-अलिबाग
दिनांक -२२/१०/२०२४

सही/-
**ॲड. प्रियांका किशोर बिर्जे**
मु. पो. कुरूळ, ता. अलिबाग,
जि. रायगड, मो. नं. ८३७९९३७८७०

# राष्ट्रकुल स्पर्धेतून हॉकीला वगळणार?

## खर्चात कपात करण्यासाठी कठोर निर्णयाची शक्यता

**। मेलबर्न । वृत्तसंस्था ।**

**रद्द होण्याच्याउंबरठ्यावरून ऐनवेळी ग्लासगो शहराने दिलेल्या साथीमुळे २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनाचा मार्ग मोकळा झाला असला, तरी खर्चाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने विविध पर्यायांचा विचार सुरू असून यातून हॉकी खेळाला वगळले जाणार असल्याची चर्चा आहे.राष्ट्रकुल स्पर्धा घेण्यासाठी खर्चाची कपात करावी लागणार आहे आणि त्यासाठी स्पर्धा नेहमीच्या १९ क्रीडा प्रकारांऐवजी १० प्रकारांत घेण्यात येणार असल्याचे म्हटले जात आहे.**




वगळण्यात येणारे खेळ कोणते हे अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी या संदर्भात तयार करण्यात आलेल्या अहवालात हॉकी खेळाचासमावेशअसल्याचेस्पष्टझालेआहे. अन्य खेळांची नावे अजून समोर आलेली नाहीत. हे वृत्त वाऱ्यासारखे पसरल्यानंतरही आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघ आणि राष्ट्रकुल क्रीडा महासंघाने प्रतिक्रिया देणे टाळले. ''या स्पर्धेचे स्वरूप आणि अधिकृत कार्यक्रम मंगळवारी जाहीर करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम समोर आल्यानंतरच आम्ही प्रतिक्रिया देऊ'', असे आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने स्पष्ट केले आहे. ही स्पर्धा सर ख्रिस हॉय वेलोड्रोम, स्कॉटस्टॉन स्टेडियम, टोलक्रॉस आंतरराष्ट्रीय जलतरण संकुल आणि स्कॉटिश इव्हेंट्स कॅम्पस अशा केवळ चारच केंद्रांवर होणार आहे. या एकाही केंद्रावर हॉकी टर्फ उपलब्ध नाही. आयोजक नव्याने टर्फ निर्माण करण्याच्या विरोधात आहेत. त्यामुळेच हॉकीला वगळण्याचा निर्णय घेण्यात आला असावा, असे मानले जात आहे.

राष्ट्रकुल स्पर्धेतून हॉकीला वगळण्याचा निर्णय झाल्यास याचा सर्वाधिक फटका भारत आणि ऑस्ट्रेलियाला बसणार आहे. भारतीय पुरुष संघाने या स्पर्धेत तीन रौप्य आणि दोन कांस्य, तर महिला संघाने २०००च्या स्पर्धेतील सुवर्ण आणि अन्यही दोन पदके पटकावली आहेत. ऑस्ट्रेलिया पुरुष संघाने पुरुष विभागातून विक्रमी सात वेळा, तर महिला संघाने चार वेळा सुवर्णपदकाची कमाई केली आहे.

## ब्रिटनच्या माजी पंतप्रधानांकडून विराट कोहलीचे कौतुक

**। इंग्लंड। वृत्तसंस्था ।**

ब्रिटनचे माजी पंतप्रधान डेव्हिड कॅमेरून यांनी भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीचे कौतुक केले आहे. एनडीटीव्ही वर्ल्ड समिटमध्ये बोलताना कॅमेरून म्हणाले- मी विराट कोहलीचा चाहता आहे. त्याची नेतृत्व गुणवत्ता उत्कृष्ट आहे.

द इंडिया सेंच्युरीच्या या समिटमध्ये जेव्हा कॅमेरून यांना त्यांच्या आवडत्या क्रिकेटरबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले- जेव्हा मी मोठा होत होतो तेव्हा मला भारताचे बिशन सिंग बेदी खूप आवडायचे. यानंतर मला राहुल द्रविडची फलंदाजीही खूप आवडली. त्याने इंग्लंडविरुद्ध शानदार शतक झळकावले. मला ते चांगलंच आठवतंय. मला त्याची फलंदाजी आवडली. स्टोक्स करतो तशीच कॅप्टनशिप कोहलीनेही केली

कॅमेरून यांनी विराट कोहलीचे वर्णन महान खेळाडू असे केले. ते कोहलीबद्दल म्हणाले की - यावेळी बेन स्टोक्स ज्या प्रकारे आमच्या (इंग्लंड) संघाचे नेतृत्व करत होता, त्याच पद्धतीने कोहलीही कर्णधार होता. या दोघांनी मैदानावर उत्कृष्ट नेतृत्व दाखवले आहे.

विराट कोहली सध्या भारत आणि न्यूझीलंडसोबतच्या मालिकेत सहभागी होत आहे. तर बेन स्टोक्स पाकिस्तानसोबतच्या मालिकेत इंग्लंडचे नेतृत्व करत आहे. भारतीय वंशाची ब्रिटिश प्रतिभा विलक्षण आहे

कॅमेरून यांनी भारतीय वंशाच्या ब्रिटिश खेळाडूंबाबतही आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले- अलीकडच्या काळात आपण भारतीय वंशाच्या उत्कृष्ट ब्रिटिश खेळाडूंची प्रतिभा पाहिली आहे. येत्या काळात आणखी भारतीय वंशाचे खेळाडू येणार आहेत.

# ढोकळेवाडी कबड्डी स्पर्धेत आसानेवाडी द्वितीय

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**




गावदेवी नांदाई माता कबड्डी मंडळ ढोकळेवाडी यांच्यावतीने आदिवासी समाजाच्या जिल्हा स्तरीय भव्य कबड्डी स्पर्धाचे आयोजन शनिवारी (दि.१८) करण्यात आले होते.

या स्पर्धेत जिल्ह्यातील नामवंत संघाने आपला प्रवेश नोंदविला होता. या स्पर्धेतील अंतिम लढत आंबिवली विरुद्ध आसनेवाडी या संघात झाली. दोन्ही संघाच्या खेळाडूने आपला बहारदार खेळ केला. शेवटी या स्पर्धेचा अंतिम विजयी आंबिवली हा संघ ठरला या संघास रोख रक्कम १० हजार व आकर्षक चषक तर उपविजेता आसनेवाडी सुधागड या संघास रोख रक्कम ७ हजार व आकर्षक चषक देण्यात आले. या स्पर्धेतील तृतीय क्रमांकांचा मानकरी उन्हेरे हा संघ ठरला. यास रोख रक्कम ५ हजार व आकर्षक चषक तर चतुर्थ क्रमांकावर कुंभारशेत या संघाला समाधान मानावे लागले या संघास रोख ४ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

## राज जाधवला सुवर्णपदक




**। खांब । वार्ताहर।**

देवकान्हे गावचा राज विजय जाधव याने मुंबई विभागात २०० मी.स्प्रिंट खेळाच्या प्रकारात सुवर्णपदक पटकावून विभागीय स्पर्धेत धडक मारली आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या या स्पर्धेत राज जाधव याने आपल्या कौशल्याच्या जोरावर या स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे.

त्याने आतापर्यंत विविध खेळ प्रकारात मोठ्या प्रमाणात पारितोषिके पटकावली आहेत.२०० मी.स्प्रिंट खेळ प्रकारात विभागीय स्तरावर त्याला प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

# पिंपळपाडा येथे सेनादलाच्या कबड्डी संघाला प्रशिक्षण

**। गडब । वार्ताहर ।**



सेनादलाच्या विरमराठा रेजिमेंटच्या कबड्डी सराव शिबीर रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पिंपळपाडा येथे घेण्यात आले. न्यु यंग संघ पिंपळपाडा यांच्या क्रिडांगणावर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, या शिबिराच्या सांगता समारंभा प्रसंगी न्यु यंग संघ पिंपळपाडा संघाने सेना दलाच्या या संघाचा सत्कार केला.

यावेळी जेएसडब्लु कंपनीचे अधिकारी, पेण तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हरिचंद्र शिंदे, कराटे, किकबॉक्सिंगचे आंतराष्ट्रीय खेळांडु किकबॉक्सिंग पंच प्रविण पाटील, सेनादल संघाचे प्रशिक्षक राष्ट्रीय प्रशिक्षक तथा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सदस्य लक्ष्मण गावंड, न्यू यंग संघाचे संस्थापक अध्यक्ष दत्ता पाटील, खजिनदार सुनील पाटील, उपाध्यक्ष गजानन पाटील सरचिटणीस हरिश्चंद्र पाटील, कासु ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच सुनंदा गांवड, राष्ट्रीय कबड्डी पंच हिरामण भोईर, योगेश टेमकर, गजानन भोईर, महेंद्र पाटील, आकाश पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

सेनादलाच्या विर मराठा रेजिमेंट, बीकानेर-राजस्थान या संघाचा सराव शिबिरासाठी सेना दलाने देखील रायगड जिल्ह्याची निवड केली. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील पिंपळपाडा येथे सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

पेण तालुक्यातील न्यु यंगसंघ पिंपळपाडा संघाचे क्रिडांगणावर हे सराव शिबीर घेण्यात आले न्यु यंगसंघ पिंपळपाडा संघाचा कबड्डी खेळांडु सध्या सेनादलात असलेला प्रदिप भगत यांनी विरमराठा रेजिमेंट संघाचे सराव शिबीर घेण्याचे ठरविले. येथील क्रीडा मंडळाच्या सदस्यांनी व ग्रामस्थांनी या खेळांडुना क्रिडांगण उपलब्ध करुन दिले. तर खेळांडुच्या राहण्याची व सर्व व्यवस्था केली.

या संघाला प्रशिक्षण देण्यासाठी रायगड जिल्ह्यातील राष्ट्रीय प्रशिक्षक लक्ष्मण गावंड यांची निवड करण्यात आली. लक्ष्मण गांवड हे अनुभवी प्रशिक्षक असल्याने त्यांनी या संघाला उत्तम प्रकारे प्रशिक्षण देण्याचे काम केले बिकानेर येथे होणाऱ्या सेनादलाच्या कबड्डी स्पर्धेमध्ये हा संघ सहभागी होणार असुन या संघासोबत लक्ष्मण गांवड प्रशिक्षक असणार आहेत.

या आगोदर लक्ष्मण गांवड यांनी २०१०ला फिरोजपुर पंजाब येथे या संघाला प्रशिक्षण दिले आहे. त्यावेळी लक्ष्मण गांवड यांना सेनादलाने आर्मी कॅप देऊन सन्मानित केले होते.

## सुनीत गायकवाडला सुवर्ण पदक



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कडाव इंग्लिश मिडियम स्कुलमधील इयत्ता दहावीमधील विद्यार्थी सुनीत गायकवाड या विद्यार्थ्याने लांब उडीमध्ये जिल्हा स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले. जिल्हा क्रीडा विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मैदानी क्रीडा स्पर्धेत कडाव इंग्लिश मिडियम स्कुलचा विद्यार्थी सुनीत गायकवाड हा स्पर्धेत उतरला होता. दहावीमध्ये शिकत असलेला सुनीत याने लांब उडीमध्ये प्रथम क्रमांक मिळवित सुवर्ण पदक पटकावले. सुनीत गायकवाड याची आता मुंबई विभागीय स्पर्धेसाठी उतरणार आहे.

# विळे शाळेचे विद्यार्थी कराटेमध्ये अव्वल

**। माणगाव । वार्ताहर ।**



सातारा जिल्ह्यामध्ये छत्रपती शाहू महाराज शाहू स्टेडियम येथे या भव्य विभागीय कराटे चॅम्पियन स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धांमध्ये सातारा नांदेड ,पुणे कराड, धुळे, रायगड येथील मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धांमध्येही आरोही रवी चव्हाण इयत्ता चौथीतील जिल्हा परिषद विळे मराठी शाळेतील विद्यार्थिनीने मेडल मिळवले आहे.

अमर यादव यांनी विळे शाळेतील विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देणे सुरू केले आहे. अनेक वेगवेगळ्या कराटे स्पर्धांमध्ये जिल्हा परिषद विळे शाळेचे विद्यार्थी सहभागी होत असतात. नुकतेच एम डीएन स्कूल कोलाड येथे जपान कराटे स्पर्धा झाल्या. यामध्ये सुमिते कराटे या प्रकारात इयत्ता चौथीतील आरोही चव्हाण हिने सिल्वर मेडल मिळवले. काता कराटेमध्ये गोल्ड मेडल मिळवले आहे. तसेच इयत्ता चौथीतील विवान विलास गोळे याने सुमिते कराटेमध्ये गोल्ड मेडल आणि प्रमाणपत्र मिळवले आहे. या विद्यार्थ्यांनी जपान कराटे असोसिएशन इंडियाच्या वतीने नुकत्याच विभागीय स्तरावरती सातारा जिल्हा येथे कराटे चॅम्पियन स्पर्धा घेण्यात आली.

## भारताने युएईला ७ विकेट राखून केलं पराभूत

**दुबई :** एसीसी इमर्जिंग टीम आशिया कप २०२४ स्पर्धेच्या साखळी फेरीत भारताने सलग दुसऱ्यांदा विजय मिळवला आहे. नाणेफेकीचा कौल युएईच्या बाजूने लागला होता. त्यानंतर प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय युएईच्या अंगलट आला असंच म्हणावं लागेल. कारण त्यांना प्रथम फलंदाजी करूनही २० षटकं पूर्ण खेळता आली नाही. युएईच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांसमोर नांगी टाकली असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. युएईकडून राहुल चोप्रा वगळता एकही फलंदाज साजेशी कामगिरी करू शकला नाही. त्याने ५० चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने ५० धावा केल्या. त्याच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर

युएईचा संघ कसाबसा १०० धावांच्या पार गेला. युएईने १६.५ षटकात सर्व गडी गमवून १०७ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी १०८ धावांचं आव्हान ठेवलं. भारताने हे आव्हान ३ विकेट गमवून पूर्ण केलं.

## पुणेरीची विजयी सुरुवात

**हैदराबाद :** पंकज मोहिते आणि मोहित गोयत यांनी चढाईत केलेल्या चमकदार कामगिरीनंतर गौरव खत्रीने (सात गुण) बचावात दाखवलेल्या चपळाईच्या जोरावर गतविजेत्या पुणेरी पलटण संघाने प्रो कबड्डी लीगच्या ११व्या हंगामाला विजयी सुरुवात केली. शनिवारी झालेल्या लढतीत त्यांनी गतउपविजेत्या हरियाणा स्टीलर्स संघाला ३५-२५ अशा फरकाने नमवले.हैदराबादच्या गचिबोवली इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या सामन्याच्या पहिल्या सत्रात दोन्ही संघांनी सावध सुरुवात केली. मात्र, १३व्या मिनिटाला पुणेरी संघाने हरियाणावर पहिला लोण चढवत आघाडी घेतली. मध्यंतराला पुणेरी संघाकडे १९-१३ अशी आघाडी होती. पहिल्या सत्रात पुणेरीकडून अस्लम ईनाम दार, पंकज आणि मोहित गोयत यांनी चमक दाखवली.

# रायगडच्या १९ वर्षाखालील मुलींचा क्रिकेट संघ जाहीर




**। पोयनाड । वार्ताहर ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित एकोणीस वर्षाखालील मुलींच्या आंतरजिल्हा निमंत्रित एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींचा संघ काल जाहीर करण्यात आला आहे.

येत्या ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्यात हि स्पर्धा होणार आहे ह्या स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या मुलींची निवड म हाराष्ट्राच्या संघात होणार आहे.म हाडच्या रोशनी पारधी हिच्याकडे रायगडच्या संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे तर समिधा तांडेल हिला उपकर्णधार करण्यात आले आहे.

## महाडची रोशनी पारधी कर्णधार

रायगड जिल्ह्याचा मुलींचा संघात रोशनी पारधी कर्णधार, समिधा तांडेल उपकर्णधार, तनिष्का वार्गे, अनिश्का वर्मा, आर्या पाटील, तनश्री सावंत, काजल साळुंके, वेदश्री शेळके (यष्टिरक्षक) मधुरा बाबर (यष्टिरक्षक) अमिषा बामणे, वेदिका तेटगुरे, ईश्वरी खेत्री, वैभवी कुलकर्णी, निशिता विठलानी. राखीव खेळाडू - स्तुती विठलानी, श्रेया पडळकर, शुभांगिनी दास, स्नेहल पवार, इच्छा यादव, आर्या शेडगे, कनक यादव, श्रीष्टी भोईर, वांशिका मोहिते, भ्रातीती रॉय, गायत्री गोडे, रितिका पाटील, आरुषी जाधव यांचा समावेश आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने जिल्ह्यातील मुलींसाठी इनडोअर सराव शिबिराचे आयोजन खारघर येथील इनामपुरीच्या मैदानावर करण्यात आले होते,

सदर शिबिरासाठी उपस्थित सर्व मुलींना प्रशिक्षक म्हणून नयन कट्टा यांनी मार्गदर्शन केले आहे. संघ निवडकर्ता म्हणून नरेंद्र मयेकर, मितेश ठाकूर व प्रदिप साळवी यांनी योगदान दिले तर प्रमुख निरीक्षक म्हणून देवेंद्र पाटील समन्वयक म्हणून रोहित काळे,प्रशांत माळी,महेंद्र भातिकरे, देवदत्त शास्त्री, प्रितम पाटील यांनी काम पाहिले तसेच आरडीसीए उपाध्यक्ष राजेश पाटील सहसचिव जयंत नाईक, कौस्तुभ जोशी, शंकर दळवी उपस्थित होते. जिल्हा क्रिकेट असो.अध्यक्ष अनिरुद्ध पाटील,सचिव प्रदिप नाईक सह सर्व पदाधिकारी,सदस्य यांनी मुलींच्या संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

## वडिलांतर्फे आयोजित धार्मिक कार्यक्रमांमुळे कारवाई

# जेमिमा रॉड्रिग्जचं खार जिमखाना सदस्यत्व रद्द

**। मुंबई । वार्ताहर ।**

**जुन्या क्लब्सपैकी एक असलेल्या खार जिमखान्याने भारतीय महिला क्रिकेटपटू जेमिमा रॉड्रिग्जचं सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. खार जिमखान्याच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार जेमिमाचे वडील इव्हान हे जिमखान्याच्या परिसरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत होते. ते समाजातील उपेक्षितांचं धर्मांतरही करुन घेत असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला.**

रविवारी खार जिमखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हा विषय पटावर ठेवण्यात आला. त्यानंतर जेमिमाचं सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात प्रतिक्रियेसाठी जेमिमा तसंच तिच्या वडिलांना फोन तसंच मेसेज करण्यात आला. मात्र ते प्रतिक्रियेसाठी उपलब्ध होऊ शकले नाहीत.

कारवाईला दुजोरा देताना खार जिमखान्याचे अध्यक्ष विवेक देवनानी यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितलं की, 'जेमिमाला तीन वर्षांचं मानद सदस्यत्व क्लबने दिलं होतं. २० ऑक्टोबरला झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत हे सदस्यत्व रद्द करावं यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला'.

खार जिमखाना कार्यकारिणी सदस्य शिव मल्होत्रा यांनी सदस्यत्व का रद्द करण्यात याची कारणं स्पष्ट केली. ते म्हणाले, जेमिमाचे वडील इव्हान हे 'ब्रदर मॅन्युअल मिनिस्ट्रीज' या संघटनेशी संलग्न असल्याचं आम्हाला समजलं. त्यांनी जिमखान्यातील प्रेसिडेन्शियल हॉल जवळपास दीड वर्षांसाठी वापरला. त्यांनी या कालावधीत तिथे ३५हून अधिक कार्यक्रम आयोजित केल्याचं आमच्या लक्षात आलं. त्या कार्यक्रमात काय चालायचं हे आम्हाला ठाऊक आहे'. 'देशभरात अनेक ठिकाणी धर्मांतराचे प्रकार सुरू असल्याच्या बातम्या आपण वाचतो. पण हे सगळं जिमखान्यात घडत होतं. त्या कार्यक्रमात नृत्य चालायचं. अतिशय महाग अशी संगीत यंत्रणा आणली जायची. जायंट स्क्रीन बसवले जायचे. खार जिमखान्याच्या घटनेतील ४अ कलमानुसार क्लबमध्ये कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केलं जाऊ शकत नाही', असं त्यांनी सांगितलं.

आमच्या कर्मचाऱ्यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली असं खार जिमखान्याचे माजी अध्यक्ष नितीन गाडेकर यांनी सांगितलं. 'मी, कार्यकारिणी सदस्य मल्होत्रा आणि अन्य काही सदस्य या कार्यक्रमात नेमकं काय चालतं हे पाहण्यासाठी गेलो. कार्यक्रमाच्या ठिकाणी गडद अंधार करण्यात आला होता. ट्रान्स पद्धतीचं संगीत लावण्यात आलं होतं. एक महिला उपस्थितांना सांगत होती की तो आपल्याला वाचवण्यासाठी येईल'. ते पुढे म्हणाले, जिमखान्याने मुशातच अशा कार्यक्रमाला परवानगी कशी दिली याचं मला आश्चर्य वाटलं. आम्ही याचा निषेध नोंदवला. रविवारी झालेल्या वार्षिक सभेत सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला'.

गेल्या वर्षी खार जिमखान्याने जेमिमाला मानद सदस्यत्व दिलं जेणेकरून क्लबच्या प्रांगणात ती येऊन सराव करू शकते.

जेमिमा रॉड्रिग्ज ही भारताची कसोटी, एकदिवसीय आणि ट्वेन्टी अशा तिन्ही प्रकारात खेळणारी अव्वल फलंदाज आहे. तिने ३ कसोटी, २१ एकदिवसीय आणि ८० टी लढतीत भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. मुंबईतल्या मैदानांमध्ये वयोगट स्पर्धांमध्ये सातत्याने चांगलं खेळल्यानंतर जेमिमाची भारतीय संघात निवड झाली. आक्रमक वेगवान खेळींसाठी जेमिमा प्रसिद्ध आहे. सोशल मीडियावर जेमिमाचे व्हीडिओ व्हायरल होत असतात. क्रिकेटपूर्वी जेमिमा महाराष्ट्राच्या हॉकी संघाकडून खेळली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)